आज्ञार्थी गीता

— व. दि. कुलकर्णी

प्रबोधन रिसर्च असोशिएटस्
१७ के. जी. बी. निवास, मुंबई ४.

आज्ञार्थी गीता

संकलन—संपादन
व. दि. कुलकर्णी

१९९०

प्रबोधन रिसर्च असोशिएटस्, मुंबई – ४०० ००४.

प्रकाशक
गुं. फ. आजगावकर
१७, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास,
मुंबई – ४०० ००४

प्रथमावृत्ती : १३ ऑगस्ट, १९९०
(गोकुळ अष्टमी, शके १९१२)

c सौ. कविता निरगुडकर
१/८ जुहू गुलमोहर सोसायटी
गुलमोहर रोड, जुहू,
मुंबई – ४०० ०४९

किंमत १५ रुपये

अक्षरजुळणी व छपाई
मायक्रोग्राफ,
१ भगवान भवन,
दादी संतुक लेन,
जे. एस. एस. रोड, चिराबाजार,
मुंबई ४०० ००२.

अनुक्रमणिका

(१) आज्ञार्थी गीता – एक निवेदन **गुं. फ. आजगांवकर** ३

(२) कृष्णार्पणमस्तु **व. दि. कुलकर्णी** ५

(३) आभार **व. दि. कुलकर्णी** ८

(४) आज्ञार्थी गीता : संहिता व सिध्दी ९

(५) श्रीमद् भगवत गीतेची थोरवी १३

(६) श्रीमद् भगवद्गीतेतील श्रीकृष्णाची भूमिका १९

सौ. सुमित्रा कुलकर्णी

(७) आज्ञार्थी गीता : संहिता २५

(८) आज्ञार्थी गीता : श्लोकांचा अन्वयार्थ ३१

(९) आज्ञार्थी गीता : मराठी अनुवाद ४१

(१०) आज्ञार्थी गीतेचा भावार्थ ४६

(११) उपसंहार ५०

परिशिष्टे

(१) भगवान श्रीकृष्ण, भगवद्गीता आणि कर्मयोग **विवेकानंद** ५६

(२) भगवान श्रीकृष्णाचीं आज्ञावचने **स्वामी शिवानंद** ६२

(३) प्रतिज्ञा गीता ६३

(४) सप्तश्लोकी गीता ६३

(५) तस्मात् गीता ६३

(६) गुरुवर्य आबासाहेब कुलकर्णी चरित्ररेखा ६५

आज्ञार्थी गीता – एक निवेदन!

– गुं. फ. आजगांवकर

माझे सन्मित्र व. दि. कुलकर्णी यांचा एक बहुमोल ग्रंथ प्रकाशित करण्याचा योग आज येत आहे. ह्या ग्रंथाचे लेखन करून तो त्यांनी प्रकाशनासाठीं माझ्याकडे द्यावा म्हणून गेली १५ वर्षे मी त्यांच्या मागें होतो. उशिरा का होईना त्यांनी आपला शब्द पाळून मला उपकृत केले म्हणून मी त्यांचा खरोखर आभारी आहे.

गुरुवर्य कृष्णाजी विष्णू तथा आबासाहेब कुलकर्णी यांच्या सारख्या थोर आचारसंपन्न, विचारसंपन्न, अशा ऋषितुल्य महर्षींचे व. दि. हे शिष्य आहेत. आदर्श गुरु आणि आदर्श शिष्य अशी ही जोडी आहे. आपल्या गुरुजींची आज्ञा 'आज्ञार्थी गीते'च्या प्रकाशनाने पूर्ण केल्याचे समाधान त्यांना निश्चितच प्राप्त होईल. त्यांची सुविद्य पत्नी सौ. सुमित्रा कुलकर्णी आज हयात नाहीं याबद्दल मला दुःख होतें. ह्या ग्रंथाच्या मागें तिची एक विशेष भावना होती.

महाराष्ट्रांतील मराठी वाङ्मय सेवकांत, संतवाङ्मयाच्या अभ्यासकांत, सहृदयी टीकाकारांत, आणि पहिल्या दर्जाच्या प्रभावी वक्त्यांत माझे सन्मित्र व.दि. कुलकर्णी यांची ख्याति आहे.

ग्रंथाची मूळ कल्पना, विचार आणि त्याचे वितरण याबाबत गुरुवर्य कृष्णाजी विष्णू तथा आबासाहेब कुलकर्णी यांच्या आदेशावरून त्यांच्या निधनानंतर त्यांचे शिष्य व. दि. कुलकर्णी यांनी हा ग्रंथ लिहिला आहे. 'कृष्णार्पणमस्तु', ह्या मथळ्याखाली प्रारंभी त्यांचे निवेदन आले आहे तें महत्वाचे आहे.

*गीता हा जगांतील एक अमोल ग्रंथ आहे. शेंकडो वर्षांच्या कालौघांत तो टिकून राहिला आहे. अनेक विद्वानांनी त्याच्यावर टीकाग्रंथ लिहिले आहेत. 'ज्ञानेश्वरी' हा मराठी ग्रंथ तर आज सातशें वर्षे वैभवशाली मराठीचा व तत्वज्ञानाचा पायाच ठरून राहिला आहे. **व.दि. कुलकर्णी** यांची ही **आज्ञार्थी गीता** पुढील अनेक शतकांसाठीं अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना उपयोगी पडणारा असा मार्गदर्शक ग्रंथ आहे. ह्या ग्रंथाच्या श्रद्धायुक्त वाचनानें, चिंतनाने, महाराष्ट्रांतील गीताभक्त अर्जुनाप्रमाणे तृप्त होओत!*

ग्रंथाची मुद्रणप्रत आपुलकीने तपासून दिल्याबद्दल श्री. मनोहर ज. बोर्डेकर यांचा व आचार्य अत्रे संशोधन मंडळाचे श्री. य.भा. अग्निहोत्री यांनी केलेल्या दैनंदिन मदतीबद्दल त्यांचे आभार मानतो.

चित्रकार डी.एस. देसाई, मुद्रक प्रभाकर देसाई, युनिक ब्लॉक्सचे अशोक नेरकर, या सर्वांचा मी आभारी आहे.

जनता जनार्दनाने ह्या ग्रंथाचा आदरपूर्वक स्विकार करावा अशी प्रार्थना आहे.

मुंबई
६/८/९०

आपला नम्र
गुं. फ. आजगांवकर

‘कृष्णार्पणमस्तु’

गुरुवर्य आबासाहेब कुलकर्णी* यांनी मला संस्कृतचा पहिला पाठ दिला. संस्कृत भाषा आणि साहित्य यांबरोबर संस्कृतीचे आणि भारतीय संस्कारांचेही पाठ दिले. बार्शीच्या न्यू इंग्लिशमध्ये १९३५-३६ साली सुरू झालेलं हे शिक्षण पुढं माझी बार्शी सुटली, पुणं सुटलं, तरी चालूच होतं. ते माझे शाळेतले केवळ संस्कृतचे शिक्षक होते असं नाही; ते माझे जीवनमार्गदर्शक होते. आपल्या ठायी ते पूर्णपणे विसावले होते; आयुष्याच्या तिन्ही आश्रमांचे – ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम आणि वानप्रस्थाश्रम यांचं त्यांनी स्वधर्मानुसार आचरण केलं होतं. निष्कामबुद्धीनं आणि परमेश्वरार्पण वृत्तीने ते या जगात विहित कर्मांचं पालन यथाविधी, यथाशास्त्र करीत असत. सद्धर्म आणि सदाचार यांचं शिक्षण आम्हांस त्यांच्या प्रत्यक्ष आचरणातूनच मिळत असे. रामायण, महाभारत, श्रीमद्भगवद्गीता यांचे समग्र मराठी अनुवाद आणि त्यांवरील टीकात्मक ग्रंथ ते वाचायला देत. उपनिषदांबरोबर स्वामी विवेकानंदांचे समग्र ग्रंथ यांचा अभ्यास कसा करावा ते सांगत. त्यांच्या संग्रही भारतीय तत्त्वज्ञान, धर्म, इतिहास, यांवरील ग्रंथसंपदा होती. मी मुंबईस आल्यावर (१९५६) जमेल तसं, त्यांच्याकडे ठाण्यास जात असे. धर्म, शिक्षण, तत्त्वज्ञान यांवर त्यांच्याशी चर्चा होई. शेवटी शेवटी ते पूर्ण वानप्रस्थाश्रमी झाले होते. साक्षित्वानं या जगाकडं–विश्वव्यवहाराकडं पाहत होते; पण अवसरोचित विहितकर्मांचा त्यांनी संन्यास घेतलेला नव्हता.

एकदा एका भेटीत त्यांनी मला ‘श्रीमद्भगवद्गीते’तील भगवान श्रीकृष्णांच्या आज्ञा एकत्र करून त्या प्रकाशित करणं अगत्याचं आहे, असं सांगितलं. त्याप्रमाणं मी दोन आठवड्यांतच श्रीकृष्णांच्या आज्ञावचनांच्या नोंदपत्रिका (note-cards) तयार केल्या आणि आबासाहेबांना भेटलो. ही

---

* गुरुवर्य आबासाहेब यांची चरित्ररेषा परिशिष्ट ६ मध्ये दिली आहे.

आज्ञावचनं वैचारिक संगतीनुसार मी लावली होती. ती तशी सलग मी वाचून दांखवली. आबासाहेबांनी ती तशीच मुद्रित करावीत व शाळांतून विद्यार्थ्यांना 'गीताजयंती'ची भेट म्हणून द्यावीत, असं सुचवलं; आणि मुद्रणाच्या खर्चासाठी म्हणून रोख रक्कमही माझ्या हवाली केली. चार पानी – पत्रिकेसारखं ते प्रकाशन झालं असतं. त्याच्या पाच हजार प्रती काढून त्या मुलांना देता आल्या असत्या, हे खरं. पण असं केवळ संहितेचं प्रकाशन व्हावं, यानं माझं समाधान होत नव्हतं. आज मुलांना पूर्वीसारखं संस्कृत येत नाही; गीतापठन आता जवळजवळ संपुष्टातच आलेलं आहे, गीताग्रंथही आजच्या जीवनव्यवहारात तसा प्रमाणग्रंथ मानला जात नाही. तेव्हा भगवान श्रीकृष्णांची आज्ञावचनं संदर्भाशिवाय, टीपा–टिप्पणीशिवाय देण्यात उपयोग नाही, असं मला वाटलं. आबासाहेबांना हे पटलं व त्यांनी त्याप्रमाणं पत्रिकेऐवजी पुस्तिका तयार करून ती मुलांना द्यावी, असं म्हटलं.

ह्या गोष्टीस आता पंधराहून अधिक वर्षं झाली. पुस्तिकाच काढायची होती तर मग इतकी वर्षं मी घ्यायला नको होती. थोडक्यात मूळ संहिता देऊन, अर्थ सांगून, आवश्यक ते प्रास्ताविक आणि उपसंहारात्मक लिहून हे काम हातावेगळं करता आलं असतं. पण मनाला ते पटेना. पुन्हा समग्र गीतेचा यथासांग अभ्यास व्हायला हवा, 'गीतारहस्या'तील निष्काम कर्मयोगाचं सूत्र पडताळून पाहायला हवं; ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेचा भावार्थ ध्यानी घ्यायला हवा; स्वामी विवेकानंदांची भाषणं पुन्हा बघायला हवीत आणि मगच श्रीकृष्णांच्या आज्ञावचनांचा तात्पर्यार्थ सांगायला हवा, असं मनानं घेतलं. तातडीची नित्यनैमित्तिक कामांची गर्दी होतीच; ती वाढतच होती.... त्यातून अशा शांत, निर्वेध अभ्यासाला, चिंतनाला वेळ मिळेना. तशात चातुर्वर्ण्यविचाराच्या संदर्भात गीतोपनिषदाच्या निषेधाचे वारे वाढत्या जोरानं व वेगानं वाहू लागले होते. गीता ही कर्मयोगपर की ज्ञानयोगपर हे तर सनातन वादग्रस्त कूटस्थळ होतंच. मी थांबलो; पण काम थांबवलेलं नव्हतं. ते चालूच होतं.

अखेर ज्ञानेश्वरीचं सप्तशताब्दिवर्ष सुरू झालं आणि या अभ्यासाला एक दिशा, एक गती प्राप्त झाली. पण त्याहीपेक्षा हे काम तातडीनं पुरं करणं मला नैतिक दृष्ट्या, धर्मदृष्ट्या आवश्यक होतं. माझ्या आईच्या हयातीत ही पुस्तिका प्रकाशात यावी अशी आबासाहेबांची इच्छा होती. माझी आई – कृष्णाबाई – १९७७ मध्ये निजधामास गेली. आबासाहेबांच्या पत्नी सौ. राधाबाई –काकी –

या नंतर चार वर्षांतच कालवश झाल्या; आणि आबासाहेबांनी -- कृष्णाजीपंतांनी – पुढं एका वर्षातच - १९८२ मध्ये देह ठेवला. अपराधित्वाची टोचणी जिव्हारी लागून राहिली. ''सारी कामं सोडून, आधी हे काम पुरं करा,'' म्हणून माझी पत्नी सौ. सुमित्रा – माहेरची कृष्णा – ही मला कधी प्रेमानं, कधी रागानं, कधी त्राग्यानं सांगत–बजावत होती. परमेश्वरानं अखेर तिलाही ३० डिसेंबर, १९८९ रोजी, अलगद उचलून आपल्या घरी नेलं. आता आणखी कोणता अपराध करायचा बाकी राह्यला? या पुण्यात्म्यांच्या न्यायमंदिरी मी जन्माचा गुन्हेगार ठरलो आहे. अक्षम्य गुन्हेगार ठरलो आहे. आता तेच हे सारं माझ्याकडून करवून घेत आहेत.

हे सारं पुण्यात्म्यांचंच आहे. भगवान श्रीकृष्णाबरोबर, या कृष्णकुलाच्या चरणी, हे त्यांचं, त्यांना अर्पण करीत आहे. श्रीकृष्णापर्णमस्तु!

व. दि. कुलकर्णी

गोकुळ अष्टमी
शके १९१२

आभार

'प्रबोधन रिसर्च असोसिएटस्' या संस्थेतर्फे 'आज्ञार्थी गीता' हे पुस्तक प्रकाशित होत आहे, याचं मला विशेष समाधान वाटत आहे. या संस्थेचे संचालक श्री. गुं. फ. आजगावकर हे निर्मळ मनाचे आणि अंतर्बाह्य स्वच्छ वर्तनाचे गृहस्थ आहेत. विद्येचा आणि सद्धर्माचा प्रसार हे व्रत म्हणून त्यांनी स्वीकारलेलं आहे. ग्रंथ–प्रकाशन हे त्याचं एक प्रमुख अंग. श्री. आजगावकर आणि त्यांची ही संस्था यांच्याशी मी गेली १५–२० वर्ष संबंधित आहे. आजगावकरांसारख्या ज्येष्ठ स्नेह्यांनी स्वयंस्फूर्तीनं प्रकाशनाचा भार उचलावा आणि सारं उत्तम रीतीनं तडीस न्यावं, हे थोर भाग्य होय. मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. मुद्रण–प्रकाशन कार्यात निरलसपणे आणि निष्कामतेने त्यांना पदोपदी साहाय्य करणारे श्री. य. भा. अग्निहोत्री (संस्थापक–संचालक : आचार्य प्र. के. अत्रे वाङ्मय संशोधन केंद्र) यांचाही मी फार ऋणी आहे. डॉ. जयंत वष्ट यांनी सौ. सुमित्राबाईंच्या निबंधाचं हस्तलिखित उपलब्ध करून दिलं. त्यांच्या श्रमाचे मोल करता येणार नाही. प.पू. नानामहाराज साखरे यांची ज्ञानेश्वरीची प्रत येथे आधारभूत मानली आहे. (आवृत्ती ३). तसंच आचार्य विनोबा भावे यांची 'गीताई' मराठी छंदोबद्ध अनुवादासाठी स्वीकारली आहे. या सर्वांचा मी फार आभारी आहे.

व. दि. कुळकर्णी

‘आज्ञार्थी गीता’ : संहिता–सिद्धी

‘श्रीमद्‌भगवद्‌गीता’ हा एक मंत्र–ग्रंथ म्हणूनही पाहिला जातो. गीतेतील प्रत्येक श्लोक हा मंत्र म्हणून घेता येतो; आणि त्याप्रमाणं मंत्रजप केला जातो. स्वामी शिवानंदांनी महत्त्वाचे असे ३१ श्लोक ‘मंत्र’ म्हणून दिलेले आहेत आणि त्यांच्या जपाचरणाची रीती स्पष्ट केली आहे. तसंच गीतापुरश्चरणाच्या विविध पद्धतींची माहिती देऊन त्यांची फलश्रुतीही सांगितली आहे. ‘गीतानुष्ठान’ हा एक साधनेचा प्रकार असून निष्काम बुद्धीनं तो केला असता साक्षात्कार घडतो, असं म्हटलं आहे.*

श्रीमद्‌भगवद्‌गीतेकडं भक्तिसाधनेचा, जपजाप्याचा ग्रंथ म्हणून उपासक ज्या निष्ठेनं पाहतात, त्याच निष्ठेनं तत्त्वज्ञानाचे अभ्यासक गीतेकडं श्रेष्ठतम अध्यात्मग्रंथ म्हणून पाहतात. स्वामी शिवानंदांनी गीताश्लोकांची निवड आणि त्यांचं संकलन विशिष्ट तत्त्वांनी केलेलं पाह्यला मिळतं. ‘एकश्लोकी गीता’, ‘सप्तश्लोकी गीता’, ‘प्रतिज्ञागीता’ अशा लघु–लघुतम रूपात गीतेच्या आशयाचा गाभा त्यांतून आपणांस पाहण्यास मिळतो. उदाहरणार्थ –

एकश्लोकी गीता

यत्र योगेश्वरः कृष्णो
यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयोर्भूतिः
ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।।

(गीता, अ. १८.७८)

‘प्रतिज्ञागीता’ ही अष्टश्लोकी गीता असून तीमध्ये भगवंतांनी आपल्या साधकांना–भक्तांना दिलेली अभिवचनं एकत्र करण्यात आलेली आहेत. उदा.

---

* Shrimad Bhagvad Gita - Swami Shivanand, Rishikesh, pp. 825-832

अनन्याश्चिन्तयन्तो मां
ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां ।
योगक्षेमं वहाम्यहम् ।।

(गीता, अ. ९.२२)

'सप्तश्लोकी' गीतेमध्ये गीतातत्त्वसार ग्रथित करण्यात आलं आहे. तीत 'ओमित्येकाक्षरं ब्रह्म...' 'ऊर्ध्वमूलमधःशाखं....' 'मन्मना भव मद्भक्तो....' अशा श्लोकांचा समावेश झालेला आहे.

स्वामी शिवानंदांनी गीतेतील भगवंतांच्या आज्ञा संकलित केलेल्या आहेत. (The Lord's Commandments in the Gita') त्या एकूण २९ आज्ञा आहेत, आणि त्या १ ते १८ अध्यायांमध्ये अनुक्रमे जशा आल्या आहेत, तशा देण्यात आलेल्या आहेत. मूळ श्लोक आणि त्याखाली त्याचं भाषांतर, असं हे संकलन आहे.

आबासाहेबांना मी संकलित केलेल्या श्रीकृष्णाज्ञा वाचून दाखविल्या तेव्हा त्यांनी मला "स्वामी शिवानंदांची 'श्रीमद् भगवद्गीता' पाहिली का?" असं विचारलं. मी ती पाहिलेली नव्हती. इंग्रजीमधली संपादित–भाषांतरित केलेली एकच गीताप्रत मी वापरीत असे, ती डॉ. राधाकृष्णन् यांची. आबासाहेबांनी मला हृषीकेश येथील 'डिव्हाईन लाईफ सोसायटी' चे स्वामी शिवानंद यांची गीता दिली. तीमधील Lord's Commandments मी शोधलेल्या श्रीकृष्णाज्ञांशी ताडून पाहिल्या. काही वचनं तीत घेतलेली नव्हती, तर काही अकारण तिथं आलेली दिसली. मी माझी वचनावली निश्चित केली. शक्य तेवढा विषयानुसार त्यांचा क्रम लावला आणि संहिता सिद्ध केली. संहितेला 'आज्ञार्थी गीता' असं नावं दिलं. Commandments म्हटलं की 'बायबल' ची आठवण होते. कृष्णाच्या आज्ञावचनांचं स्वरूप थोडं वेगळं आहे. आज्ञार्थ रूप असलं तरी त्या प्रेमाच्या, समाश्वसनाच्या, वडीलधाऱ्या कर्त्या पुरुषाच्या मायेनं ओलावलेल्या आहेत. ते आदेश नाहीत.

पुढं यादृष्टीनं गीतेच्या वेगवेगळ्या संपादित प्रती पाहत असता श्री. ग.का.रायकर यांनी संपादित केलेली 'सार्थ श्रीमद्भगवद्गीता' (जयहिंद प्रकाशन, झावबावाडी, मुंबई– १९६९) ही छोटीशी प्रत हाती आली. तीमध्ये '**तस्मात् गीता**' नावाचं एक २१ श्लोकांचं संकलन आढळलं. या संकलनामागील

भूमिका आणि उद्दिष्ट तिथं प्रारंभी दिलं आहे, ते असं – ''भाविक माणसं दररोज गीतेचा निदान एक अध्याय तरी पाठ म्हणतात. या पठनाकरता ते बारावा किंवा पंधरावा अध्याय निवडतात; पण त्यांत समग्र गीतेचा सारांश येऊ शकत नाही. **'तस्मात् गीते'**तले २१ श्लोक पठन केल्यास सगळ्या गीतेचं तात्पर्य लक्षात येतं. यास्तव हे २१ श्लोक मुखोद्गत करणाराला सगळी गीता जाणल्याचं श्रेय मिळतं.''

या गीतावेच्यात – संकलनात – प्रत्येक श्लोकात 'तस्मात्' हे पद येतं. (अपवाद म्हणून एक श्लोक 'तस्मात्'पदरहित आहे.) या श्लोकांचा क्रम विषयसंगतीनं लावण्यात आलेला आहे. येथील बहुतांशी श्लोक आज्ञावचनयुक्तच आहेत. '' 'तस्मात् गीता' कोणी सिद्ध केली आहे?'' अशी मी श्री. ग. का. रायकर यांच्याकडं विचारणा केली असता, त्यांना नक्की काही सांगता आलं नाही; मात्र 'आपण स्वतः ती सिद्ध केली नाही', हे त्यांनी स्पष्ट केलं. लोकमान्यांच्या 'गीतारहस्या' तून 'तस्मात् गीता' रचनेची प्रेरणा झाली असावी, असंही रायकर म्हणाले. मी 'आज्ञार्थी गीता' सिद्ध करताना 'तस्मात् गीता' हिचाही विचार केला आहे.*

---

* परिशिष्टामध्ये 'सप्तश्लोकी गीता', 'प्रतिज्ञा गीता' आणि 'तस्मात् गीता' यांच्या संहिता निर्दिष्ट केल्या आहेत.

‘श्रीमद् भगवद्‌गीते’ची थोरवी

पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ।
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशध्यायिनी–
मम्ब त्वा मनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ।।

भगवान नारायणांनी, म्हणजे प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णांनी, अर्जुनाला स्वतः उपदेशिलेली, आणि प्राचीन मुनी श्री व्यास यांनी महाभारतामध्ये ग्रथित केलेली श्रीमद् भगवद्गीता, अद्वैतरूप अमृताचा वर्षाव करते आणि संसारताप दूर करते. हे माते, भगवद्‌गीते, मी तुझं स्मरण करतो; चिंतन करतो.

श्रीमद् भगवद्‌गीता हे उपनिषदांचं सार आहे. सर्व उपनिषदं या गायी होत आणि नंदाचा पुत्र श्रीकृष्ण हा त्यांचं दोहन करणारा, धार काढणारा गोपाल होय. अर्जुन हा या गीतामृताचं – दुग्धाचं प्राशन करणारा ‘वत्स’ आहे. भगवान श्रीकृष्णांनी बुद्धिमान अर्जुनासाठी मोक्षासारखं श्रेष्ठ फल देणाऱ्या गीतामृताचं दोहन केलं.

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ।

ज्ञानेश्वरांनी गीतेला ‘भारतकमळपराग’ असं म्हटलं आहे. महाभारत हे विशाल सुंदर कमलपुष्प असून, गीता ही या पुष्पातील पराग होय. पराग फलधारणा करतात; तेच फलरूप होतात. महाभारताच्या वीरगाथेतील तत्त्वज्ञान आणि धर्मविचार गीतेमध्ये फलत्व पावले आहेत. केवळ महाभारताचं नव्हे, तर सर्व वाङ्मयांचं मंथन करून हाती आलेलं रत्न म्हणजे गीता, असं ज्ञानेश्वरांनी म्हटलं आहे.

हे गीतानाम विख्यात । सर्व वाङ्मयाचें मथित ।
आत्मा जेणें हस्तगत । रत्न होय ।।

ज्ञान ऐसिया रूढी । वेदांती जयाची प्रौढी ।
वानिता कीर्ती चोखडी । पातली जगीं ।।
बुद्ध्यादिकें डोळसें । हे जयाचें का कवडसें ।
मी सर्वद्रष्टाही दिसें । पाहला जया ।
तें हें गा आत्मज्ञान । मज गौप्याचेंही गुप्त धन ।
परी तूं म्हणौनि आन । केवीं करूं ।।

(ज्ञा. १८. १३२३–२६)

गीता हे सर्व वेदांचं सार आहे. या गीताज्ञानानं आत्मरूपरत्न हाती येतं. गुह्यात गुह्य असं हे ज्ञान आहे आणि वेदान्त शास्त्रात याला प्रौढ पदवी लाभली आहे. या ज्ञानाच्या रूपवर्णनानं सर्व शास्त्रांना कीर्ती प्राप्त झाली आहे. या ज्ञानापुढं बुद्ध्यादी ज्ञाने म्हणजे केवळ कवडसे होत. ''गीताज्ञानाच्या उदयानं सर्वद्रष्टा असा 'मी' दिसू लागतो,'' असं श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात.

ज्ञानेश्वरांनी पुढं तर गीतेला 'वेदांचं मूळसूत्र', 'वेदांचं बीज' असं म्हटलं आहे.

एवं वेदाचें मूळसूत्र । सर्वाधिकारैक पवित्र ।
श्रीकृष्णें गीताशास्त्र । प्रकट केलें ।। १८.१४२६।।
तरी जयाच्या निःश्वासीं । जन्म झाले वेदराशी ।
तो सत्यप्रतिज्ञ पैजेसीं । बोलला स्वमुखें ।। १४२८ ।।
जें न नशतुं स्वरूपें । जयाचा विस्तारू जेथ लपे ।
तें तयाचें म्हणिपे । बीज जगीं । १४३०।
तरी कांडत्रयात्मकु । शब्दराशी अशेखु ।
गीतेमाजीं असे रुखु । बीजीं जैसा ।। १४३१ ।।
म्हणोनि वेदांचे बीज । श्रीगीता होय हें मज ।
गमे आणि सहज । दिसतही आहे । १४३२ ।

वेद हे ज्या ईश्वराच्या श्वासोच्छ्वासातून निघाले, तो सत्यप्रतिज्ञ ईश्वरच, प्रतिज्ञा करून, स्वमुखानं गीताशास्त्र बोलला आहे. तेव्हा गीताशास्त्र हे वेदांचं मूळ आहे. ते वेदांचं बीजही आहे. बीज हे वृक्षस्वरूप नसतं; पण त्याच्या ठायी वृक्षाचा विस्तार अंतर्गत असतो; म्हणजेच वृक्ष बीजामध्ये गुप्तरूपानं वसतो; तसा त्रिकांडवेद (कर्म, भक्ती व ज्ञान) गीतेमध्ये गुप्तरूपानं वसत आहे. पवित्र असं हे

गीताशास्त्र सर्वांचं आहे. त्याच्या श्रवणपठनाचा अधिकार सर्वांना आहे.

मूळ वेदांहून गीता ही उदार आणि संपन्न आहे असं ज्ञानेश्वर सांगतात.

एवं सकळसंख्यासिद्धु । श्रीभगवद्गीता प्रबंधु ।
हा औदार्ये आगळा वेदु । मूर्तु जाण । १८. १४५६।।
वेदु संपन्नु होय ठाईं । परी कृपणु ऐसा आनु नाहीं ।
जें कानीं लागला तिहीं । वर्णांच्याची । १४५७ ।।
येरां भवव्यथा ठेलियां । स्त्रीशूद्रादिकां प्राणियां ।
अनवसरू मांडूनिया । राहिला आहे । १४५८ ।।
तरी मज पाहतां उणें । मागील फेडावया गीतापणे ।
वेदु वेठला भलतेणें । सेव्य होआवया । १४५९ ।

वेद हे श्रीमंत आहेत; पण उदार नाहीत. ते कृपण आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णांच्याच कानी ते लागतात. आपलं हृद्गत फक्त त्यांच्याच कानांत सांगतात. संसारव्यथेनं पीडित झालेल्या स्त्रीशूद्रादी जीवांना वेदांच्या ठिकाणी रिघाव नाही. यावर ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, ''वेदांना आपला हा मागील उणेपणा, हा कृपणपणा जाणवला असावा, आणि तो दूर करावा, कोणीही आपलं सेवन करावं व आपणांस तशी कीर्ती लाभावी, या हेतूनं वेदच गीतारूप घेऊन प्रकट झाले आहेत.''

या लागीं मागिली कुटी । भ्याला वेदु गीतेच्या पोटीं ।
रिगाला आतां गोमटी । कीर्ति पातला । १४६५।
म्हणौनि वेदाची सुसेव्यता । ते हे मूर्त जाण श्रीगीता ।
श्रीकृष्णें पंडुसुता । उपदेशिली । १४६६ ।।

गीतेला ज्ञानेश्वरांनी 'शास्त्रराज' असं म्हटलं आहे. (ज्ञा. १८.१४८०)

श्रीमद्भगवद्गीतेला 'उपनिषद्' असं मुळातच संबोधलेलं आहे. गीता हे ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्र आहे असं प्रत्येक अध्यायाच्या शेवटी म्हटलेलं आहे. श्रीकृष्णार्जुनांच्या संवादातून प्रकटलेलं हे अध्यात्मशास्त्र आहे.* मोक्ष हे गीतेचं अंतिम उद्दिष्ट आहे, हे खरं; पण जगाची त्रिगुणात्मक प्रकृती पाहता या उद्दिष्टाकडं जाण्याचा मार्ग दाखविताना गीतेनं ज्ञान, कर्म आणि भक्ती यांचा

---

* 'इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे'

समन्वय साधलेला आहे. ज्ञानेश्वर तर ह्या तिन्ही निष्ठा एकवटून गीतेत प्रकटल्या आहेत, असं सांगतात. भागवतधर्मीय साधनभक्तीपेक्षा ज्ञानेश्वरांच्या भक्तीचं स्वरूप वेगळं आहे. बाबामहाराज आर्वीकर म्हणतात, ''ज्ञान, कर्म वा योग हे कमी दर्जाचे नव्हेत; पण भक्तीवाचून ते शून्य होत. त्यांचा जन्म भक्तीवाचून झालेला नाही. भक्तीतच ते उगम पावतात व भक्तिरूप होऊन अंती भक्तिविलासातच प्रकटत राहतात. भक्त व भक्ती हे सर्वदेशीयत्वानं सर्वांगविलासी धर्म्यदर्शन होय.''

Gita wonderfully harmonises the philosophy of action, devotion and knowledge. All the three must be harmoniously blended if you wish to attain perfection. You should have the head of Shri Shankaracharya, the heart of Loard Buddha and the hand of king Janak.*असं हृषीकेशचे स्वामी शिवानंद म्हणतात. लो. टिळकांच्या मते गीता हे ज्ञानमूलक भक्तिप्रधान निष्काम कर्मयोगशास्त्र आहे; पण ज्ञानेश्वरांनी गीता हे अद्वैत भक्तीचं म्हणजे परमभक्तीचं; म्हणजेच ज्ञान, कर्म आणि भक्ती यांचं एकजिनसी, एकवट शास्त्र, असंच मानलं आहे. गीता प्रवर्तली ती अर्जुनाला 'कर्मयोग' विशद करून दाखविण्यासाठी व त्यास कर्मप्रेरणा देण्यासाठी! यासाठी तिनं ज्ञाननिष्ठा आणि ज्ञानमार्ग म्हणजे काय, ते स्पष्ट केलं आणि अंती ज्ञानोत्तर कर्मयोगाचं सहजरूप म्हणजे 'भक्ती', हे निदर्शनास आणून दिलं. ज्ञानेश्वरी–टीकेचा हा क्रम आहे; हे आदि–अंतीचं रहस्य आहे.

गीतेसारखा जीवनधारक आणि जीवनोद्धारक धर्मग्रंथ दुसरा कोणता असेल, असं वाटत नाही. अध्यात्मज्ञानाची ही अक्षय खाण आहे. ती अखंड अमृत–प्रवाहिनी आहे. तिला कल्पतरू – कामधेनू असंच म्हटलं आहे. लंडनमधील एका मोठ्यात मोठ्या ग्रंथालयास महात्मा गांधींनी भेट दिली असता ग्रंथपालाला विचारलं की, ''इथं कोणत्या आध्यात्मिक ग्रंथाची वारंवार मागणी केली जाते?'' तेव्हा ''श्रीमद्‌भगवद्‌गीता'', असं ग्रंथपालाचं उत्तर आलं. ही गोष्ट ५०–६० वर्षांपूर्वीची आहे. आज गीताग्रंथाचं हे भाग्य उणावलंही असेल; पण अजूनही विदेशात भारतीय धर्म, संस्कृती आणि तत्त्वज्ञान यासंबंधी जो परमादर आहे आणि प्रशंसाबुद्धी आहे, ती गीतेमुळे आहे, ही वस्तुस्थिती आहे.

---

* 'Shrimad Bhagavad Gita' - Swami Shivanand, Ed. fifth, p. 11-12

गीताग्रंथ हा हिंदुधर्माच्या तीन आद्य प्रमाणग्रंथांतील – 'प्रस्थानत्रयी'तील एक ग्रंथ आहे. हा ग्रंथ सर्वांसाठी सर्वकालचा आहे. तो केवळ अर्जुनापुरता, त्याच्या काळची, त्याची समस्या सोडवणारा ग्रंथ नाही. अर्जुन हे एक निमित्त आहे, कुरुक्षेत्रावरील कौरव–पांडव युद्ध हेही एक निमित्त आहे. खरं तर, हे सारं जग म्हणजेच एक विराट युद्धक्षेत्र आहे आणि आपल्या प्रत्येकाचं अंतर्याम ही त्यातली कुरुभूमी आहे. भारतीय युद्ध हे सदासर्वदा आपल्यामध्ये अखंड चालूच असतं आणि आपल्या ठायी गोंधळलेल्या अर्जुनाला पदोपदी, परोपरी कृष्णासारखा गुरू, मार्गदर्शक आणि सखा हवा असतो.

परी वत्साचेनि वोरसें । दुभतें होय धरोद्देशें ।
जालें पांडवाचेनि मिषें । जगदुद्धरण ।।
चातकाचिये कणवें । मेघु पाणियेसिं धावे ।
तेथ चराचर आघवें । निवालें जेवीं ।
का अनन्यगती कमळा – । लागीं सूर्य ये वेळोवेळां ।
की सुखिया होईजे डोळां । त्रिभुवनीचा ।।
तैसें अर्जुनाचेनि व्याजें । गीता प्रकाशूनि श्रीराजें ।
संसारायेवढें थोर ओझें । फेडिलें जगाचें ।।
(ज्ञा. अ. १८, १४६७ – १४७०)

वासराच्या मायेनं गाय दूध देते, पण त्यामुळं साऱ्या घरादाराला दुधाचा लाभ होतो. चातकाचा कळवळा येऊन मेघ त्वरेनं जलवर्षाव करतो आणि अवघी चराचर सृष्टी ते पाणी पिऊन तृप्त होते; सूर्याकडे डोळे लावून बसलेल्या कमळकळीसाठी सूर्य वेळोवेळा आकाशात प्रकटतो आणि त्रिभुवनातले सारे नेत्र आनंदित होतात. तसं अर्जुनाच्या मिषानं भगवान श्रीकृष्णांनी गीतोपदेश सांगितला खरा, पण त्यामुळं जगावरचं संसाराचं प्रचंड ओझं कमी झालं; जगाचा उद्धार झाला. गीता ही स्वधर्मकथन करते आणि त्याचवेळी स्वधर्म हाच मोक्षमार्गी कसा होतो, हे सांगते; पटवून देते.

गीता हे सुबोध रूपातलं उपनिषदसार आहे. त्याच्या मोकळ्या संवादरूपानं आणि कृष्णार्जुनातील अवर्णनीय प्रेमभावामुळं ते गोड झालं आहे. ते केवळ 'सुसेव्य' झालं आहे, असं नव्हे; तर ते साहाय्यक, उपकारक आणि आनंददायक झालं आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''गीतेमुळं वेद सुलभ

झाला, कारण तो आता खऱ्या अर्थानं मनात प्रवेश करू शकतो, श्रवणमिषानं तो कानांत शिरतो व जपमिषानं तो मुखात राहतो. जो स्वतः गीतेचा नित्यपाठ करतो, किंवा गीतापाठ करणाऱ्याच्या संगतीत राहतो, अथवा गीताग्रंथ लिहून लोकांस देतो, तो स्वतः मोक्षसुख अनुभवतो आणि संसारबाजारात प्राणिमात्रांस सरसकट मोक्षसुखाचं सदावर्तच घालीत असतो. गीता ही उत्तम, अधम अशी निवड न करता आपल्या सर्व उपासकांना मोक्षपद देते. ज्ञानेश्वर अर्जुनाचे जणू आभार मानतात, कारण त्याच्यामुळे सर्व जगाला अशा मोक्षकारक गीतेचा लाभ झाला.

बापकुळ तें पवित्र । जेथिंचा पार्थु या ज्ञाना पात्र ।
जेणें गीता केलें शास्त्र । आवारू जगा ।। १८.१४७२ ।।

गीता हा केवळ ज्ञानामीमांसा करणारा ग्रंथ नाही, तर तो प्रेरणा देणारा, मोक्षमार्गी लावणारा उद्धारक ग्रंथ आहे.

श्रीमद् भगवद्गीतेतील श्रीकृष्णाची भूमिका*

सौ. सुमित्रा कुलकर्णी

श्रीकृष्ण :
पूर्णपुरुष, पूर्णावतार

भगवान श्रीकृष्णाला आपण केवळ पूर्णपुरुषच नव्हे, तर परमेश्वराचा पूर्णावतार, असं मानतो. मथुरा–वृंदावनातील गोपालकृष्ण, महाभारतातील श्रीकृष्ण आणि गीतोपनिषद सांगणारा भगवान श्रीकृष्ण, अशा तीन भूमिकांतून श्रीकृष्णाचं व्यक्तिमत्त्व पूर्णत्व पावतं. खरोखरं श्रीकृष्णाचं व्यक्तिमत्त्व एकरंगी आणि एकपोती नाही, ते अतिशय संमिश्र स्वरूपाचं (Complex) आहे; आणि याला कारण महाभारतकारांची– श्री व्यासमहर्षींची वास्तवदृष्टी, हेच होय. श्रीप्रभु रामचंद्रांचं चित्रण वाल्मीकी ऋषींनी 'मर्यादापुरुषोत्तम' म्हणून काढलं आहे; त्यामुळं अर्थातच ते सद्गुणांचा केवळ आदर्श ठरलं आहे. वास्तवदर्शी महाभारतकार व्यासमहर्षींनी कृष्णाचं व्यक्तिचित्र रेखाटताना मानव आणि पूर्णमानव अशा दोन्ही रूपांची सारखीच कदर बाळगली आहे. भागवतकारांनी भक्तितत्त्व प्रस्थापित करण्याच्या हेतूनं अनेक हरिकथा सांगून श्रीकृष्णाला पुरतेपणी अवताररूप बनविलं आहे. महाभारतकारांच्या मागं असला कसलाही हेतू नसल्यानं, आणि महाभारत हे मूलतः ऐतिहासिक महाकाव्य असल्यानं, त्यात श्रीकृष्णाचं जे दर्शन होतं, ते मानवातून देवत्व पावलेल्या एका पूर्णपुरुषाचं! 'श्रीमद्भगवद्गीता' म्हणजे या पूर्णपुरुषाचं प्रकट असं तत्त्वज्ञानात्मक – आध्यात्मिक रूप होय.

सर्वोपनिषदो गावो
दोग्धा गोपालनंदनः

वास्तविक पाहता व्यासमहर्षींनी गीतेत आपल्यापुढं जो कृष्ण उभा केला आहे,

---

* १९६५ साली, ब्राह्मण सभा, गिरगाव, मुंबई, यांनी गीता – जयंती – महोत्सवात आयोजित केलेल्या निबंधस्पर्धा – परीक्षेसाठी सौ. सुमित्रा कुलकर्णी यांनी सिद्ध केलेला निबंध, पारले येथील लोकमान्य सेवा संघाच्या वतीने सादर केला होता. त्यास पारितोषिक मिळाले होते. 'आज्ञार्थी गीते' च्या संहितेला संदर्भदर्शक आणि रहस्योद्घाटक प्रस्तावना म्हणून तो इथं घेतला आहे.

तो भारतीय युद्धातील अर्जुनाचा सारथी म्हणून ! श्रीकृष्ण अर्जुनाच्या रथाचं सारथ्य तर उत्तम करतातच, पण अर्जुनाचा मनोरथ जो युद्धारंभाआधीच पार ढासळला होता, त्याचंही सारथ्य अचूकपणे करतात. अर्जुनाच्या मनोरथाचं कृष्णानं केलेलं सारथ्य म्हणजे 'श्रीमद्‌भगवद्‌गीता' होय. हे सारथ्य केवळ अर्जुनाच्या मनाचंच नाही, तर अर्जुनाच्या निमित्तानं अशाच किंकर्तव्यमूढ झालेल्या मानवाचं व प्रज्ञावंताचंही ते सारथ्य करतात. गीतेतील श्रीकृष्णाची भूमिका म्हणजे कौरवांकडं शिष्टाई करणाऱ्या राजकारणी मुत्सद्याची नाही किंवा प्रासंगिक अरिष्टं दूर करणाऱ्या – कालियामर्दन करणाऱ्या बलवंताची नाही. सनातन असे, मानवी जीवनातील मूलभूत प्रश्न सोडविणाऱ्या तत्त्ववेत्त्याची, कर्मयोग्याची ती भूमिका आहे. सर्व उपनिषदांचं अमृतसार काढणाऱ्या, महर्षीहून महर्षीची, ही भूमिका आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणजे उपनिषदरूपी गार्यीची धार काढणारा – दोग्धा गोपालनंदन आहे. गोपवधूंना प्रियकर वाटणारा, वृद्धांना शिशू दिसणारा, देवांना 'अधीश' असणारा श्रीकृष्ण आपल्या भक्तांना 'नारायण' आणि योग्यांना 'अग्राही ब्रह्म' दिसतो. भक्तांना आणि योग्यांना दिसणारं श्रीकृष्णाचं हे ब्रह्मस्वरूप, म्हणजे श्रीकृष्णाचं गीतेतील अंतिम रूप होय.

'गीते'चं जन्मकारण

गीतेचा जन्मच मुळी मानवी जीवनातील मूलभूत समस्येचा उलगडा करण्याच्या प्रक्रियेत झाला आहे. आपल्याला कोणाकोणाबरोबर युद्ध करायचं आहे, हे प्रत्यक्ष पाहण्यासाठी, अर्जुन श्रीकृष्णास आपला रथ उभयसेनांच्या मध्ये घेण्यास सांगतो. प्रत्यक्ष पाहतो तेव्हा त्यास पितामह, आचार्य, काके–मामे, पुत्र–मित्र, सुहृद–श्वशुर तेथे असलेले दिसतात. त्याचं सारं अवसानच नष्ट होतं. त्याच्या शरीराला कंप सुटतो, तोंडाला कोरड पडते, हातातून धनुष्य गळून पडतं, मनाला भोवळ येते. ''आप्तस्वकीयांच्या रक्तानं माखलेलं राज्य घेण्यात सुख ते कसलं? त्यापेक्षा मी स्वतःच ठार झालो, तर अधिक बरं ! कुलक्षयाचं पातक माझ्या माथी नको. कुलक्षय झाला की कुलधर्म उध्वस्त होतात. कुलधर्म नष्ट झाले की कुलस्त्रिया दूषित होतात व वर्णसंकर ओढवतो आणि सबंध मानवी जीवनाचा नरक बनतो; पितर उपाशी राहतात. या घोर पातकाचं मला धनी व्हायचं नाही, आततायी बंधूंना आणि पूजार्ह, महानुभाव अशा गुरुजनांना ठार करून, मी रुधिरप्रदिग्ध भोग कसे भोगू? मी धर्मसंमूढचेत झालो आहे. कृष्णा, मी तुझा अनन्यगतिक शिष्य आहे. मला श्रेय नेमकं कोणतं, ते सांग'', असे अतिशय आर्त उद्‌गार अर्जुनाच्या मुखातून बाहेर पडतात. अर्थातच शोकाकुल अर्जुनाला प्रथम धीर देऊन युद्धोन्मुख करणं, हे श्रीकृष्णाचं पहिलं तातडीचं काम होतं.

अध्यात्मकथनाची निकड

अर्जुनाची ही मन:स्थिती 'अनार्य', 'अकीर्तिकर', 'अस्वर्ग्य' अशा शब्दांनी श्रीकृष्णांनी निंदिली आहे. एवढंच नाही तर, अर्जुनाला हे 'क्लैब्य' कसं आठवलं, याचंच त्यांना आश्चर्य वाटतं. ज्या जन्ममृत्यूसंबंधी अर्जुन प्रज्ञावाद करतो, त्या जन्ममृत्यूसंबंधीच्या भ्रामक कल्पनेवरच श्रीकृष्णांनी प्रथम प्रहार केला आहे. ''ज्याचा शोक करू नये, त्याचा शोक करून तूच मला शहाणपणाच्या गोष्टी ऐकवतोस,'' ('अशोच्यानन्वशोच्यस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे') असा प्रारंभीच टोला देऊन, श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, 'देह हे अंतवंत आहेत आणि आत्मा हा अज, अविनाशी आहे. 'न जायते म्रियते वा कदाचित्' – तो जन्मतही नाही आणि त्यास मृत्यूही येत नाही; 'न हन्यते हन्यमाने शरीरे' – शरीर ठार केलं, तरी तो ठार होत नाही. त्याला शस्त्रं तोडू शकत नाहीत, अग्नी जाळू शकत नाही, पाणी भिजवू शकत नाही, वारा वाळवू शकत नाही; असा तो अमर आहे; अव्यक्त, अविकारी, अचिन्त्य आहे. अर्जुना, त्याला मारणारा तू कोण आणि असा मरणारा तरी तो कोण?'' ... भगवान श्रीकृष्णांनी एकदम अध्यात्माच्या मुळाशीच हात घातला आहे आणि अर्जुनाला जाग आणली आहे. या तत्त्वज्ञानाचीच येथे पहिल्या झटक्यास आवश्यकता होती. अर्जुनाच्या शोकाची निरर्थकता, अप्रस्तुतता उघड होताच, खरं तर, काहीच मग सांगणं – बोलणं उरत नाही. मृत्यूसंबंधीचं लौकिक समजाचं भ्रमपटल दूर झाल्याशिवाय अर्जुनाचा शोक दूर होणं कठीण होतं.

'स्वधर्मा'ची महती : लौकिक स्तरावरील

अशी एकदा विश्वाच्या सृजनाची आणि त्यातील अविनाशी अमर तत्त्वाची समज येताच मग श्रीकृष्ण लौकिक – ऐहिक पातळीवरून अर्जुनाला जागं करतात. त्याला स्वधर्माची आठवण करून देतात. ''धर्मविहित युद्धाशिवाय क्षत्रियाला श्रेयस्कर अन्य काहीच नाही. धर्म्ययुद्ध म्हणजे क्षत्रियांपुढं उघडलेलं स्वर्गाचं द्वारच होय. हे युद्ध क्षत्रियांनी केलं नाही, तर त्याला कर्तव्यच्युतीचं पातक लागेल; अकीर्तीचा कलंक लागेल; आणि जनामध्ये 'युद्धाला भिऊन पळाला' अशी छीः थू: होईल, ते वेगळंच!'' श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, ''जिंकलास तर पृथ्वीचा उपभोग घेशील आणि धारातीर्थी पडलास तर स्वर्गसुख लाभेल.'' ('हतो वा प्राप्यसि स्वर्गं, जित्वा वा भोक्ष्यसे महीम्)

श्रीकृष्णाची दुहेरी भूमिका

श्रीमद्भगवद्गीतेच्या प्रारंभीच भगवान श्रीकृष्णाची भूमिका (१) आध्यात्मिक आणि (२) लौकिक, अशी दुहेरी रूपाची दिसून येते. वास्तविक आध्यात्मिक आणि

लौकिक ह्या दोन भूमिका विसंगत नसून त्या परस्परपोषकच आहेत. सर्व गीता पुढं विस्तारली आहे, ती या दोन भूमिकांचं एकजीवित्व सिद्ध करण्यासाठीच! नाहीतर गीतेतील तत्त्वार्क दुसऱ्या अध्यायातच येऊन जातो आणि 'स्थितप्रज्ञा'च्या वर्णनानं या तत्त्वार्काचं प्रत्यक्ष रूपही पण दुसऱ्या अध्यायात स्पष्ट होतं. निष्काम कर्मयोग आचरणाऱ्या श्रीकृष्णाच्या कृतीमागील विश्वात्मकतेचं आणि विश्वोत्तीर्णतेचं तत्त्वज्ञान म्हणजेच 'श्रीमद् भगवद्गीता' होय. श्रीकृष्ण स्वतःच या तत्त्वज्ञानाचं सगुण–साकार रूप होय!

'गीते'तील 'मी' = पुरुषोत्तम

श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील श्रीकृष्ण एकाच वेळी आध्यात्मिक आणि लौकिक अशा भूमिकांवर आरूढ झाल्याचं आपण पाहिलं. ज्या अज, अव्यय, अविनाशी आत्म्याचं वर्णन प्रारंभालाच श्रीकृष्णांनी अर्जुनापुढं केलं, त्याचीच सुसंगत, तर्कशुद्ध मांडणी करीत करीत अखेर 'पुराणपुरुषोत्तम'च्या स्वरूपात ते कसं परिणत झालं आहे, हे आपणांस पाह्यला मिळतं. गीतेनं श्रीकृष्णाच्या रूपानं 'पुराणपुरुषोत्तम' उभा केला आहे. 'गीते'तील 'मी' म्हणजेच हा 'पुरुषोत्तम' होय. हा पुरुषोत्तम क्षर आणि अक्षर, ह्या दोहोंच्या पलीकडचा, आद्यपुरुष आहे– की जिथं पोहोचलं असता परत फिरणं नाही. यामुळं जेव्हा श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, ''अर्जुना, तू मन्मन हो, मत्परायण हो;' तेव्हा त्या 'मी' मध्ये सारं विश्व तर सामावलेलं आहेच, पण विश्वारंभापूर्वी आणि विश्वानंतरही असणारे 'अनाद्यनंत' हेच तत्त्व अभिप्रेत आहे. (केशवसुतांच्या 'नवा शिपाई' या कवितेतील

पूजितसे मी कवणाला?
पूजितसे मी आपुल्याला
आपुल्यामाजी विश्व पाहुनी,
पूजितसे मी विश्वाला !

हा विचार आपल्या कल्पनाशक्तीनं जितका ताणता येईल, तितका ताणल्यास 'मन्मना भव मद्‌भक्तः' यातील भूमिकेची थोडीफार कल्पना करता येईल.)

पुरुषोत्तमाचा विभूतियोग आणि विश्वरूपदर्शन

भगवान श्रीकृष्णाचं हे 'पुरुषोत्तमरूप' गीतेत जागोजाग वेगवेगळ्या संदर्भात विशद झालेलं आहे. आपलं विश्वव्यापकत्व आणि विश्वाची उभारणी व संहारणी यांचं कर्तृत्व, 'मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना' आणि

सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम् ।
कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ।।

यातून श्रीकृष्णांनी व्यक्त केलं आहे.

यद्यद्विभूतमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवाऽ वगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ।

या उद्गारातून श्रीकृष्णाचा 'विभूति–योग' स्पष्ट होतो, आणि मनोगम्य अशा 'पुरुषोत्तमा' चं ज्ञान विश्वरूपदर्शनाच्या योगे नेत्रगोचर होतं. परमेश्वराचं हे अनादी अमर रूप पाहून आपण 'अशोच्या' संबंधी शोक करीत होतो, याची अर्जुनाला खात्री होते. श्रीकृष्णाच्या ह्या आध्यात्मिक–वैश्विक–ज्ञानानं त्याचा शोक दूर होतो.

कर्मयोग : चतुःसूत्री

अर्जुनाचा केवळ शोक दूर करणं, एवढंच श्रीकृष्णाचं कार्य नव्हतं, तर शोकावेगातून मुक्त झालेल्या अर्जुनाला कार्यप्रवृत्त करणं, हा त्यांच्या कार्याचा उत्तरार्ध होता. त्यासाठी श्रीकृष्ण आपली 'योगेश्वरा' ची भूमिका अर्जुनापुढं उभी करतात. 'योगः कर्मसु कौशलम्' हे या योगाचं लक्षण म्हणून श्रीकृष्ण सांगतात. कर्म करण्याची कुशलता, चातुर्य म्हणजे योग. जन्माला आलेल्या प्राण्याला कर्म सुटत नाही. मग तो यती, मुनी, संन्यासी कोणीही असेना! प्रत्येक माणूस कायिक, वाचिक, मानसिक कर्म अहर्निश करीतच असतो. किरीटी, गदाधारी, चक्रपाणी श्रीकृष्ण म्हणजे 'योगेश्वर श्रीकृष्ण' होत. गीतेच्या अध्याय–समाप्तिदर्शक संकल्पात 'ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे' अशी पदे येतातच.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्म फलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ।।

या श्लोकात श्रीकृष्णांनी 'निष्काम कर्मयोगाची चतुःसूत्रीच सांगितली आहे.

१) कर्म करण्यापुरताच आपला अधिकार असतो,
२) फलावर आपला अधिकार नाही,
३) म्हणून कर्माचरण निर्हेतुकबुद्धीने करावे;
४) कर्मसंन्यास अयोग्य.

ही ती चतुःसूत्री होय. 'या बुद्धीनं तू कर्माचरण कर', असा श्रीकृष्ण अर्जुनाला आदेश देतात.

'योगस्थः कुरु कर्माणि'
'तस्माद्योगाय युज्यस्व'

'योगमातिष्ठ, उत्तिष्ठ भारत,'

या आदेशांतील अभिप्राय हाच आहे. दैवी संपत्तीचे आणि आसुरी संपत्तीचे लोक यांच्यामध्ये संघर्ष सुरू होतो, तेव्हा तर प्रत्यक्ष परमेश्वराला अवतार घ्यावा लागतो.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।

हा भगवंताचा 'परमयोग'च होय!

'गीता' : योगेश्वर पुरुषोत्तमाची वाङ्मयी मूर्ती

गीता म्हणजे शुद्ध वेदान्ताधारे कर्माकर्माचं आणि त्याचबरोबर मोक्षाच्या उपायाचं पूर्ण विवेचन करणारं 'ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोगा'चं शास्त्र होय, असं लो. टिळक यांनी म्हटलं आहे.

ज्या धर्म–अधर्म, पाप–पुण्य, कर्तव्य–अकर्तव्य यांच्या संदेहावस्थेत अर्जुन सापडला होता, तो त्याचा संदेह नष्ट होतो; त्यास आपण मुळात कोण आहोत; आपला धर्म (= नियत कर्म) काय आहे, ह्याची जाणीव होते. 'नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा' असं तो म्हणतो, आणि 'स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव', असं श्रीकृष्णाला वचन देतो. भगवान श्रीकृष्णाच्या, अशा ह्या 'योगेश्वर पुरुषोत्तमा'च्या भूमिकेचा कायमचा गौरव महर्षी व्यासांनी, गीतेच्या अखेरच्या श्लोकात करून ठेवला आहे –

'यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।।

गीता = योगेश्वर श्रीकृष्ण

एखादं तत्त्वज्ञान, तत्त्वज्ञान म्हणून श्रेष्ठ असलं तरी ते प्रत्यक्ष जगदुद्धारक क्रांतिकारक व्हावयाचं असेल, तर त्याच्या आचाराची बाजूही तत्त्वप्रतिपादकानं तपशिलानं देणं आवश्यक असतं. आगरकरांनी आपल्या विचाराची किंवा मार्क्सनं आपल्या तत्त्वज्ञानाची आचार–संहिता दिल्याचं पाहण्यास मिळतं. 'पुरुषोत्तम श्रीकृष्णांनी 'योगेश्वर श्रीकृष्ण' उभारून हेच केलं आहे. श्रीकृष्ण म्हणजे पूर्णपुरुष – पूर्णावतार होय ! अध्यात्म आणि व्यवहार यांचं समन्वित प्रतीक होय! गीता याचा साक्षात्कार घडविते.

आज्ञार्थी गीता : संहिता

भगवान श्रीकृष्णांनी धर्म–अधर्माविषयी गोंधळलेल्या, संमूढ झालेल्या अर्जुनाला स्वधर्म म्हणजे काय, तो आचरणं हे प्रत्येकाचं कर्तव्य कसं आहे; हे कर्तव्यकर्म कोणत्या भावनेनं करायचं असतं; या स्वधर्माचरणानं पुरुष कर्मबंधनातून कसा मुक्त होतो व अंती त्यास परमानंदाचा लाभ कसा होतो, ते गीतोपदेशातून सांगितलं आहे. एकेका मुद्याचं वैचारिक–तात्त्विक विवरण करून होताच, भगवान श्रीकृष्ण 'आता तू हे कर ,' 'आता तू असं कर,' 'आता तू नीट मन देऊन ऐक', 'आता तू हे दिव्य दृष्टीनं पाहा', 'आता तू तुझा निर्णय घे', असं अर्जुनाला सांगतात. ही चिंतनाची, कृतीची आज्ञार्थी वचनं विशिष्ट क्रमानं वाचली असता, आणि त्यांचं चिंतन–मनन केलं असता गीतेतील ज्ञान–कर्म–भक्तियोगाचं एका 'पराभक्ती'त होत गेलेलं, परिपक्व, परिपूर्ण रूप पाहावयास मिळतं. आज्ञार्थी गीताश्लोकांची विषयक्रमानुसार होईल तेवढी सुसंगत अशी मांडणी करून, सिद्ध होणारी संहिता पुढे देत आहे –

संहिता

(१) श्रृणु मे परमं वच:

१. क्लैब्यं मा स्म गम: पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ।। २.३ ।।

२. अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।
विनाशमव्ययास्य न कश्चित्कर्तुमर्हसि ।। २.१७ ।।

३. मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदु:खदा: ।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ।। २.१४ ।।

४. अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ता शरीरिणः ।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ।। २.१८ ।।

५. हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ।। २.३७ ।।

६. सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैनं पापमवाप्स्यसि ।। २.३८ ।।

७. भूय एव महाबाहो श्रृणु मे परमं वचः ।
यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ।। १०.१ ।।

(२) नियतं कुरु कर्म त्वं

८. कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोस्त्वकर्मणि ।। २.४७ ।।

९. तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ।। ३.१९ ।।

१०. चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।
तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ।। ४.१३ ।।

११. नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।
शरीरयात्रापि च ते न प्रसिद्धेयदकर्मणः ।। ३.८ ।।

१२. यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः ।
तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसङ्गः समाचर ।। ३.९ ।।

१३. कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ।। ३.१५ ।।

१४. एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ।
कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ।। ४.३२ ।।

१५. एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ।। ४.१५ ।।

(३) योगः कर्मसु कौशलम्

१६. योगस्थः कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनंजय ।
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ।। २.४८ ।।

१७. दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ।। २.४९ ।।

१८. बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।
तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।। २.५० ।।

१९. तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ।
छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ।। ४.४२ ।।

२०. यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव ।
न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ।। ६.२ ।।

२१. नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन ।
तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ।। ८.२७ ।।

२२. तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।
कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ।। ६.४६ ।।

२३. तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ।। १६.२४ ।।

(४) विद्धि एनं इह वैरिणम्

२४. काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।
महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ।। ३. ३७ ।।

२५. तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशकम् ।। ३.४१ ।।

२६. एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ।
जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ।। ३.४३ ।।

(५) मन्मना भव मद्भक्त :

२७. मय्यासक्तमनाः पार्थ योगं युञ्जन्मदाश्रयः ।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ।। ७.१ ।।

२८. तस्मात् सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च
मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंभवम् ।। ८.७ ।।

२९. चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः ।
बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चितः सततं भव ।। १८.५७ ।।

३०. यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ।। ९.२७ ।।

३१. मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ।। ९.३४ ।।

३२. अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ।। ९.३० ।।
क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति ।
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ।। ९.३१ ।।

३३. किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।
अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ।। ९.३३ ।।

(६) सर्वगुह्यतमं भूयः शृणु

३४. मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ।। १२.८ ।।

३५. अथचित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ।। १२.९ ।।

३६. अभ्यासेऽपि असमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ।। १२.१० ।।

३७. अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुंमद्योगमाश्रितः ।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ।। १२.११ ।।

३८. तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।। १८.६२ ।।

३९. इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद् गुह्यतरं मया ।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ।। १८.६३ ।।

४०. सर्वगुह्यतमं भूयः श्रणु मे परमं वचः ।
इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ।। १८.६४ ।।

४१. मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यासि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ।। १८.६५ ।।

४२. *यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवागच्छ त्वं मम तेजोंशसंभवम् ।। १०.४१ ।।

४३. यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ।। ९.६ ।।

(७) युध्यस्व विगतज्वरः

४४. न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ।। ११.८ ।।

४५. द्रोणं च भीष्मं च जयद्रथ च
कर्णं तथान्यानपि योधवीरान् ।
मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा ।
युध्यस्व जेतासि रणे सपत्नान् ।। ११.३४ ।।

---

* 'अहमात्मा सर्वभूताशयस्थितः' (सर्व भूतांच्या अंतरी असणारा आत्मा मी आहे.) हे कसं, ते सांगत असताना 'मां विद्धि पार्थ बृहस्पतिं' (अ. १०.२४), 'विद्धि मामृतोद्भवम्' (अ. १०.२७) असं म्हणत म्हणत वहाव्या अध्यायातील 'विभूतियोग' पूर्ण होतो. २१ ते ३९ असे हे एकूण १९ श्लोक आहेत आणि मग शेवटी 'यद्यद्विभूतिमत्सत्त्वं ...' हा श्लोक येतो.

४६. तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व ।
जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् ।
मयैवेते निहताः पूर्वमेव ।
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ।। ११.३३ ।।

४७. मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
शीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ।। ३.३० ।।

(८) मोक्षयिष्यामि मा शुचः

४८. सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।। १८.६६ ।।

आज्ञार्थी गीता : श्लोकांचा अन्वयार्थ

(१) **हे पार्थ** –हे पार्था, **क्लैब्यं** –अशा दुर्बलपणास, भ्याडपणास, **मा स्म गमः** – थारा देऊ नकोस, प्राप्त होऊ नकोस, **एतत्** –हे (मानसिक दौर्बल्य), **त्वयि** –तुझ्या ठिकाणी, **न उपपद्यते** – उचित दिसत नाही; तुला शोभत नाही. **हे परंतप** –शत्रूंना ताप देणाऱ्या हे अर्जुना, **क्षुद्रं हृदयदौर्बल्यं** – हृदयाचं हे क्षुद्र दौर्बल्य, दुबळेपणा, **त्यक्त्वा** – टाकून, **उत्तिष्ठ** –ऊठ. (२.३)

(२) **तु** –पण, **येन** –ज्याने, **इदं सर्वं** – हे सर्व दृश्य जगत्, **ततं** – व्यापिले आहे, **तत्** – ते आत्मतत्त्व, ब्रह्मं; **अविनाशी** – नाश न पावणारे, नित्य आहे असे, **विद्धि** – तू जाण, **अस्य अव्ययस्य** – ज्याचा व्यय होत नाही अशा तत्त्वाचा, **विनाशं कर्तुं** – विनाश करण्यास, **कश्चित्** – कोणीही, **न अर्हति** – योग्य, समर्थ नाही. (२.१७)

(३) **कौन्तेय** – हे कुंतीपुत्रा, **तु** – परंतु, **मात्रास्पर्शाः** – मात्रा म्हणजे इंद्रिये, त्यांचे स्पर्श म्हणजे विषयांसी संयोग, **शीत–उष्ण–सुखदुःखदाः** – थंडी व उष्णता यांचा अनुभव देऊन त्यांच्या योगाने सुख व दुःख देणारे आहेत; तसेच ते **आगम अपायिनः** – उत्पत्ती व विनाश यांनी युक्त आहेत; म्हणजे त्यांना आदी व अंत आहे. म्हणूनच ते **अनित्याः** – नित्य न राहाणारे; काही कालच टिकणारे आहेत. **अतः** – यास्तव, म्हणून, **भारत** – हे अर्जुना, **तान्** – त्यांना, त्या शीतोष्णादी मात्रास्पर्शांना, **तितिक्षस्व** – सहन कर. (२.१४)

(४) **नित्यस्य** – नित्य; **अ** –नाशिनः – नाश नसणाऱ्या, म्हणजे अविनाशी, आणि, **अप्रेमयस्य** – मोजता न येण्यासारखे, अतर्क्य, अशा या **शरीरिणः** –शरीर धारण करणाऱ्या आत्म्याचे, **इमे देहाः** – हे सर्व देह, **अन्तवन्तः** – अंत पावणारे, नाश होणारे आहेत. **तस्मात्** – म्हणून, **भारत** – हे अर्जुना, **युध्यस्व** – युद्ध कर. (२.१८)

(५) **हतः वा** – (युद्धात शत्रूकडून) मारला गेलास तर, **स्वर्गं प्राप्स्यसि** – स्वर्गाला

प्राप्त होशील; **जित्वा वा** – किंवा शत्रूंना तू जर जिकलेस, तर **महीं भोक्ष्यसे** – पृथ्वीचा उपभोग घेशील. **तस्मात्** – यास्तव, म्हणून, **हे कौन्तेय** – हे कुंतीपुत्रा अर्जुना, **कृतनिश्चयः** – (मी शत्रूंना मारीन किंवा मरेन), असा निश्चय करून, **युद्धाय उत्तिष्ठ** – युद्ध करण्यास ऊठ. (२.३७)

(६) **सुखदुःखे समे कृत्वा** – सुख व दुःख यांना तुल्य म्हणजे समान मानून, (सुखाविषयी आसक्ती व दुःखाविषयी द्वेष न करता), **लाभालाभौ च जयाजयौ च समे कृत्वा** – त्याचप्रमाणे लाभ व अलाभ (नुकसान, तोटा), जय व पराजय यांनाही तुल्य समजून, **ततः** – मग, **युद्धाय युज्यस्व** – युद्धाला तयार हो, **एवं** – याप्रमाणे, म्हणजे अशा भावनेने युद्ध करू लागलास म्हणजे, **पापं न अवाप्स्यसि** – तुला पाप लागणार नाही. (२.३८)

(७) **महाबाहो** – हे शूर अर्जुना, **भूयः एव** – पुनरपि, **मे** – माझे, **परमं वचः** – श्रेष्ठ वचन, बोलणे, **शृणु** – ऐक, **यत्** – जे, **अहं** – मी, **प्रीयमाणाय तं** – (ऐकून) संतुष्ट होणाऱ्या तुला, **हितकाम्यया** – तुझे हित व्हावे, या इच्छेने, **वक्ष्यामि** – सांगत आहे. (१०.१)

(८) **ते** – तुझा, **अधिकारः** – अधिकार, **कर्मणि एव** – कर्मातच, कर्म करण्याइतकाच आहे; **फलेषु** – फलांविषयी, **कदाचन** – केव्हाही, **मा** – नसो. (तुझा अधिकार नसो, तुझी तृष्णा नसो.) त्याप्रमाणे तू **कर्मफलहेतुः मा भूः** – कर्मफलाची इच्छा करून त्या फलाचे कारण, निमित्त, होऊ नकोस, **ते संगः** – तुझी प्रीती, आसक्ती, **अकर्मणि** – कर्म न करणे, या गोष्टीत **मा अस्तु** – न होवो (२.४७)

(९) **तस्मात्** – म्हणून, त्या अर्थी, **असक्तः** – आसक्ती सोडून, **सदा** – नेहमी, **कार्यं कर्म** – कर्तव्यकर्म म्हणजे वर्णाश्रमविहित नित्य कर्म, **समाचर** – तू कर. **हि** – कारण, **असक्तः** – फलामध्ये आसक्त न होता, **कर्म आचरन्** – कर्म करणारा (ईश्वरार्पण बुद्धीने कर्म करणारा), **पूरुषः** – पुरुष, (चित्तशुद्धीच्या द्वारा), **परं** – मोक्षास, **आप्नोति** – प्राप्त होतो. (३.१९)

(१०) **मया** – मी, **गुण–कर्म–विभागशः** – गुणांचा विभाग व कर्मांचा विभाग करून, त्याच्या अनुरोधाने; स्वभावधर्म आणि तदनुरूप त्यांची कर्मे ह्यांना अनुसरून, **चातुर्वर्ण्यं** – चार वर्ण, ब्राह्मण–क्षत्रिय–वैश्य–शूद्र; **सृष्टं** – उत्पन्न केले आहेत. **तस्य**

कर्तारं मां अपि – त्याचा कर्ता म्हणून मला तू (लौकिक दृष्टीने) जाणलेस तरी, **अकर्तारं** – अकर्ता आहे, **विद्धि** – असे जाण. **(मां) अव्ययं (विद्धि)** – मला अविनाशी, अविकारी, जाण. (असंसारी म्हणजे या निर्मितीशी संबद्ध नसलेला जाण.) (४.१३)

(११) **त्वं** – तू, **नियतं कर्म कुरु** – नित्य, नेमलेले, विहित कर्म तू कर, **हि** – कारण, **अकर्मणः** – कर्म मुळीच न करण्यापेक्षा, **कर्म ज्यायः** – कर्म करणे श्रेष्ठ आहे. **च** –व, **ते शरीरयात्रा अपि** – तुझी शरीरस्थितीही देहकर्मही, (जीवनयात्राही), **अकर्मणः** – कर्म न करण्याने, **न प्रसिद्ध्येत्** – उत्तम प्रकारे, शास्त्रविहित मार्गाने सिद्ध होणार नाही. (३.८)

(१२) **अयं लोकः** – मानव, हे जग, **यज्ञार्थात् कर्मणः** – यज्ञार्थ केलेल्या कर्माहून, ईश्वरार्थ केलेल्या कर्माहून, **अन्यत्र** – अन्य कर्माने, **कर्मबंधनः** – कर्मबद्ध होतो. **कौंतेय** – हे अर्जुना, **मुक्तसंगः** – कर्मफलाविषयीची आसक्ती सोडून, **तदर्थं** – ईश्वरासाठी, **कर्म समाचर** – कर्म कर. (३.९)

(१३) **कर्मब्रह्मोद्भवं विद्धि** – कर्माची उत्पत्ती ब्रह्मापासून आहे, असे जाण. (याचा अर्थ – 'यजमानादिकांचे कर्म, वेदांपासून उदभ्वलेले आहे; वेद हे कर्माचे कारण–प्रमाण–आहे, हे जाण,' असाही केला जातो.) **ब्रह्म अक्षरसमुद्भवम्** – आणि हे ब्रह्म अक्षरापासून, म्हणजे परमात्म्यापासून, उत्पन्न झाले आहे; (येथे 'ब्रह्म' म्हणजे वेद असाही अर्थ केला जातो.) **तस्मात्** – म्हणून, **सर्वगतं ब्रह्म** – सर्वव्यापी ब्रह्म, **यज्ञे प्रतिष्ठितम्** – यज्ञात उत्तम रीतीने अधिष्ठित आहे. (३.१५)

(१४) **एवं** – अशा प्रकारे, **बहुविधाः यज्ञाः** – अनेक प्रकारचे यज्ञ (द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ, स्वाध्याययज्ञ, ज्ञानयज्ञ इत्यादी यज्ञ), **ब्रह्मणः** – ब्रह्ममुखात, (किंवा वेदांच्यात मुखांत, वेदद्वारा), **वितताः** – विस्तारलेले आहेत; **तान्–सर्वान्** – त्या सर्वांना, **कर्मजान्** – कर्मापासून झालेले, **विद्धि** – तू जाण. **एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे** – असे जाणून तू (कर्मबंधनातून अशुभ संसारापासून) मुक्त होशील; सोडविला जाशील. (४.३२)

(१५) **पूर्वैः अपि मुमुक्षुभिः** – पूर्वीच्याही मुमुक्षूंनी म्हणजे मोक्षाची इच्छा करणाऱ्यांनी, **एवं ज्ञात्वा** – असे जाणून, **कर्म कृतं** – कर्म केले; **तस्मात्** – म्हणून, **त्वं पूर्वैः** – तू पूर्वीच्या मुगुक्षूंनी, **पूर्वतरं कृतं कर्म** – त्याच्याही पूर्वीचे केलेले कर्म, **एव** –

तेच कर्म, परंपरागत कर्म, **कुरु** – कर. (४.१५)

(१६) **हे धनंजय** – हे अर्जुना, **योगस्थः** – योगामध्ये स्थित–स्थिर होऊन, **संगं त्यक्त्वा** – कर्माच्या फळाविषयी आसक्ती सोडून, **सिद्ध्यसिद्ध्योः** – सिद्धी व असिद्धी यांविषयी, **समः भूत्वा** – सम होऊन, **कर्माणि कुरु** – विहित कर्मे कर, **समत्वं** – सिद्धी व असिद्धी यांना समान मानणे, हाच, **योगः उच्यते** – योग म्हटला जातो. (२.४८)

(१७) **(हे) धनंजय** – हे धनंजया, **बुद्धियोगात्** – या समत्वबुद्धियुक्त कर्माहून, किंवा ज्ञानयोगाहून, **कर्म** – फलाच्या इच्छेने केलेले कर्म, **दूरेण हि** – फारच, **अवरं** – निकृष्ट आहे. यास्तव **बुद्धौ** – साम्यबुद्धीच्या ठिकाणी, **शरणं अन्विच्छ** – आश्रय मिळविण्याची इच्छा कर; आश्रय शोध (परमार्थशरण हो.) **फलहेतवः** – फलाच्या तृष्णेने, फळावर नजर ठेवून काम करणारे, **कृपणाः** – दीन, अज्ञ, तुच्छ होत. (२.४९)

(१८) **बुद्धियुक्तः** – ज्ञानयुक्त पुरुष (सुखदुःख सम मानणारा, साम्यबुद्धीने जो युक्त झाला तो), **इह** – या लोकी, **उभे सुकृत दुष्कृते** – पुण्य व पाप हे दोन्हीही, **जहाति** – सोडतो, टाकून देतो, **तस्मात्** – म्हणून, **योगाय युज्यस्व** – समत्वरूप योगाला तू तयार हो. (समत्वरूप योगामध्ये स्थित होऊन ज्ञानप्राप्तीसाठी कर्मे कर,) कारण, **योगः** – सिद्धी व असिद्धी यांना सम मानणे, हा योंग, **कर्मसु** – कर्मातील, **कौशलं** – कुशलता होय. (२.५०)

(१९) **तस्मात्** – म्हणून, **अज्ञानसंभूतं** – अज्ञानापासून, अविवेकामुळे उत्पन्न झालेल्या, **हृत्स्थं** – बुद्धीत असलेल्या, हृदयातल्या, **आत्मनः एनं संशयं** – आत्म्याविषयीच्या या संशयाला, **ज्ञानासिना** – ज्ञानरूपी असि, म्हणजे खड्ग तिने; (शोकमोहादी दोषांना घालविणाऱ्या यथार्थज्ञानरूप तरवारीने), **छित्वा** – तोडून, छेदून टाकून, **योगं** – ज्ञानसाधनभूत कर्मानुष्ठान, **आतिष्ठ** – कर. **हे भारत** – हे अर्जुना, (आता अगोदर), **उत्तिष्ठ** – (युद्धाला) उभा राहा. (४.४२)

(२०) **पांडव** – हे अर्जुना, **यं संन्यासं इति प्राहुः** – ज्याला (श्रुतिस्मृतिवेत्ते) खरा संन्यास असे म्हणतात, **तं** – त्याला **योगं विद्धि** – कर्मयोग असे जाण. **हि** – कारण, **असंन्यस्त–संकल्पः** – ज्याने संकल्प टाकलेला नाही, वासनांचा संन्यास केला नाही, असा, **कश्चन** – कोणी, **योगी न भवति** – कर्मयोगी होत नाही. (६.२)

(२१) **हे पार्थ** – हे अर्जुना, **एते सृती** – हे दोन मार्ग, **जानन्** – जाणणारा, **कश्चन योगी** – कोणीही योगी, **न मुह्यति** – मोहित होत नाही, **तस्मात् हे अर्जुन** – म्हणून हे अर्जुना, **सर्वेषु कालेषु** – सर्वकाळी, **योगयुक्तः भव** – तू समाहित चित्त हो. (८.२७)

(२२) **तपस्विभ्यः** – तपस्व्यांहून, (कृच्छ्रचांद्रायणादि तप करणाऱ्या तपस्व्यांहून), **योगी** – योगसिद्धीमुळे परागती (=मोक्ष) प्राप्त झालेला योगी, **अधिकः** – श्रेष्ठ होय, **ज्ञानिभ्यः अपि** – ज्ञानी पुरुषांहून, शास्त्रपांडित्यवंतांहूनही, **अधिकाः मतः** – योगी अधिक, श्रेष्ठ मानला जातो. **योगी** – योगाभ्यासी **कर्मिभ्यः च** – अग्निहोत्रादिक कर्मे करणारांहून ही, **अधिकः** – श्रेष्ठ आहे. **अर्जुन तस्मात् योगी भव** – अर्जुना, म्हणून तू योगी हो. (६. ४६)

(२३) **तस्मात्** – म्हणून, **कार्याकार्यव्यवस्थितौ** – कर्तव्य व अकर्तव्य यांच्या निश्चयाविषयी, यासंबंधी निर्णय घेण्याबाबत, **ते** – तुला, **शास्त्रं प्रमाणं** – शास्त्र हेच प्रमाण आहे. तेव्हा, **शास्त्रविधानोक्तं ज्ञात्वा** – शास्त्रामध्ये काय विहित आहे, ते जाणून, **इह** – या कर्माधिकारभूमीत, येथे, **कर्म** – कर्तव्यकर्म, धर्म, **कर्तुं अर्हसि** – करण्यास तू योग्य आहेस. (१६.२४)

(२४) **एषः** – हा, **कामः** – विषयवासना, (पुरुषाला पापात प्रवृत्त करणारा हा काम) **एषः क्रोधः** – हा क्रोध आहे; **रजोगुणसमुद्भवः** – हा काम, हा क्रोध रजोगुणापासून उत्पन्न होतो. **महाशनः** – तो मोठा खादाड आहे; म्हणून **महापाप्मा** – तो महापापी आहे. **इह** – या जगात, या संसारात, **एनं वैरिणं विद्धि** – या कामाला, या क्रोधाला वैरी समज. (३.३७)

(२६) **हे भरतर्षभ** – हे अर्जुना, **तस्मात् त्वं** – म्हणून तू, **आदौ** – अगोदर, आधी, **इंद्रियाणि नियम्य** – इंद्रियांचे नियमन करून, **ज्ञान–विज्ञान–नाशनं** – शास्त्रज्ञान व आत्मसाक्षात्काररूप ज्ञान यांचा नाश करणाऱ्या, **एनं पाप्मानं** – या पाप्याला (काम–क्रोधादी शत्रूला), **प्रजहि** – सोड, त्याचा परित्याग कर; ठार मार. (३.४१)

(२६) **हे महाबाहो** – हे पराक्रमी अर्जुना, **एवं** – याप्रमाणे, **बुद्धेः परं**– बुद्धीच्या पलीकडे असलेल्या, **आत्मानं** – आत्म्याला, **बुद्ध्वा** – जाणून घेऊन; **आत्मना संस्तभ्य** – स्वतः (सुसंस्कृत मनानेच त्याचे) उत्तम रीतीने स्तंभन करून, आवरून धरून,

दुरासदं – जो हाती लागणे फार कठीण आहे, दु:साध्य, **कामरूपं शत्रुं** – कामरूप शत्रूला, **जहि** – ठार कर. (३.४३)

(२७) **(हे) पार्थ** – हे अर्जुना, **मयि आसक्तमना:** – माझ्यामध्ये ज्याचे मन आसक्त झाले आहे असा, **मदाश्रय:** – माझाच ज्याने आश्रय केला आहे, व **योगं युञ्जन्** – योगाभ्यास करणारा असा तू, **समग्रं मां** – (विभूति–बल–ऐश्वर्य इत्यादी)समस्त गुणांनी युक्त अशा मला, **यथा** – ज्या प्रकारे, **असंशयं ज्ञास्यसि** – नि:संशय जाणशील, **तत् श्रृणु** – ते ऐक (७.१)

(२८) **तस्मात्** – म्हणून, **सर्वेषु कालेषु** –सर्वकाळी, अहोरात्र, **मां अनुस्मर** – मला आठव, माझे स्मरण कर, **युध्य च**– आणि युद्ध कर. **मयि अर्पितमनोबुद्धि:** – माझ्या ठिकाणी ज्याने आपले मन व बुद्धी अर्पिली आहेत, असा तू, **मां एव** – मलाच, माझ्याकडेच, **एष्यसि** – प्राप्त होशील, मिळशील. **असंशय:** – यात संशय नाही. (८.७)

(२९) **सर्वकर्माणि** – सर्व कर्मे, **चेतसा** – विवेकबुद्धीने, **मयि संन्यस्य** – मज ईश्वराच्या ठिकाणी अर्पण करून, **मत्पर:** – मत्परायण होऊन, म्हणजे मी ज्याला श्रेष्ठ आहे, असा होऊन, **बुद्धियोगं** – (साम्य) बुद्धियोगाचा, **उपाश्रित्य** – आश्रय करून, **मच्चित:** – माझ्या ठिकाणी ज्याचे चित्त आहे असा, **सततं भव** – तू नेहमी हो. (१८.५७)

(३०) **कौंतेय** – हे अर्जुना, **यत्** – तू जे, **करोषि** – करतोस, **यत् अश्नासि** – जे खातोस, **यत् जुहोषि** – जे हवन करतोस, **यत् ददासि** – जे दान करतोस, **यत् तपस्यसि** -- जे तप करतोस, **तत्** – ते सर्व, **मदर्पणं कुरुष्व** – मला समर्पण कर. (९.२७)

(३१) **मन्मना: भव** – माझ्या ठिकाणीच ज्याचे मन आहे (किंवा मी–मय ज्याचं मन झाले आहे) असा तू हो; **मद्भक्त:** – माझाच भक्त हो. **मद्याजी (भव)** – माझीच पूजा करण्याचे ज्याचे शील आहे असा हो. **मां नमस्कुरु** – मला नमस्कार कर: **एवं** – याप्रमाणे भगवंताचे ठिकाणी चित्ताला, **युक्त्वा** – समाहित करून, स्थिर करून, **मत्परायण:** – (मलाच सर्वश्रेष्ठ साध्य मानून) मी–मय होणारा, झालेला तू, **आत्मानं** – [मां एव] – सर्वांचा आत्मा असा जो मी–ईश्वर–त्याला, **एष्यसि** – प्राप्त होशील. (९.३४)

(३२) **अपिचेत्** – जरी कदाचित्, **सुदुराचार:** – अतिशय निंद्य आचरण करणारा एखादा, **अनन्यभाक्** – अनन्य भक्त होऊन, **मां भजते** – मला भजू लागला, तरी, **स:**

साधुः एव – तो सदाचरणसंपन्नच आहे, असे **मन्तव्यः** – मानावे; **हि** – कारण, **सः सम्यक् व्यवस्थितः** – तो चांगल्या प्रकारे निश्चित झालेला असतो, म्हणजे त्याच्या बुद्धीचा निश्चय चांगला झालेला असतो. (९.३०)
सः – तो, **क्षिप्रं** – सत्वर, **धर्मात्मा भवति** – धर्मयुक्त वृत्तीचा, आचरणाचा होतो. **शश्वत् शांतिं निगच्छति** – शाश्वत शांतीला जातो; प्राप्त होतो. **कौन्तेय, मे भक्तः न प्रणश्यति** – हे अर्जुना, माझा भक्त कधीही नाश पावत नाही, असे तू **प्रतिजानीहि** – पक्के समज. (९.३१)

(३३) **पुनः** – तर मग, **पुण्याः ब्राह्मणाः** – पुण्ययोनीत जन्मलेले ब्राह्मण, पुण्यवान, **तथा** – त्याचप्रमाणे, **राजर्षयः** ज्ञानी क्षत्रिय श्रेष्ठ, **भक्ताः** – माझे भक्त असतील, तर **किं** – काय सांगावे? ते श्रेष्ठ गतीला जातीलच. (पापयोनी पुरुष माझ्या आश्रयाने परमगतीला जातात, हा पूर्वसंदर्भ.) तेव्हा **इमं अनित्यं असुखं लोकं** – या अनित्य व सुखरहित, दुःखकारक लोकास, (जगास), **प्राप्य** – प्राप्त होऊन, (म्हणजे मृत्युलोकी जन्माला आला आहेस म्हणून) **मां भजस्व** – मला भज. (९.३३)

(३४) **मयि एव** – माझ्यामध्येच, **मनः आधत्स्व** – (आपले) मन स्थिर कर. (तू आपल्या मनाला माझ्या सगुण विश्वरूपात स्थापित कर.) **मयि बुद्धिं निवेशय** – माझ्यामध्ये बुद्धीला प्रविष्ट कर. तिलाही माझ्या स्वरूपातच राहू दे. (तू आपले मन व बुद्धी–या दोन्ही चित्तवृत्तींना माझ्याच ठिकाणी स्थिर केलेस) म्हणजे **अतः ऊर्ध्वं** – यानंतर, **मयि एव निवसिष्यसि** – माझ्या ठिकाणीच तू राहशील. **न संशयः** – यात शंका नाही. (१२.८)

(३५) **अथ** – आता जर, **मयि** – माझ्या ठिकाणी, **चित्तंस्थिरं समाधातुं** – आपल्या मनाला स्थिरपणे, अचलपणे ठेवण्यास, **न शक्नोषि** – शक्य होत नसेल, तू समर्थ नसशील, **ततः** – तर मग, **हे धनंजय** – हे अर्जुना, **मां** – मला, **अभ्यासयोगेन** – मनाला वारंवार आवरून धरून, पुनः पुन्हा प्रयत्न करून, माझ्याच ठिकाणी ते स्थिर करण्याचे पाहा. अभ्यासपूर्वक योगाने हे **आप्तुं** – प्राप्त होण्याची, **इच्छ** – इच्छा कर. (१२.९)

(३६) **अभ्यासे अपि असमर्थः** – असा अभ्यास करण्यास असमर्थ असशील, तर मग **मत्कर्मपरमः भव** – माझ्यासाठी कर्म करणे, हेच एक काम करीत राहा; ईश्वरासाठी कर्म करणे, हेच आपले मुख्य कर्तव्य समज, कारण **मदर्थं अपि** – माझ्यासाठीही, **कर्माणि**

कुर्वन् – कर्मे करणारा असा तू, **सिद्धिं अवाप्स्यसि** – सिद्धीला (चित्तशुद्धी, योग, ज्ञानप्राप्ती या क्रमाने मोक्ष या सिद्धीस) प्राप्त होशील. (१२.१०)

(३७) **अथ(चेत्)** – आता जर, **एतत् अपि** – हेही, **कर्तुं अशक्तः असि** – करण्यास तू असमर्थ असशील, **ततः** – तर मग, **मद्योगं** – सर्व कर्मे मला अर्पण करून त्यांचे अनुष्ठान करणे, या योगाचा, **आश्रितः** – आश्रय करून व **यतात्मवान्** – आपल्या चित्ताचे संयमन करून, **सर्वकर्मफलत्यागं कुरु** – सर्व कर्मांच्या फळाचा त्याग कर. (१२.११)

(३८) **भारत**, हे अर्जुना, **तं एव** – त्याच ईश्वराला **सर्वभावेन** – सर्व प्रकारे, सर्वतोपरी मनोभावे, **शरणं गच्छ** – शरण जा. **तत्प्रसादात्** – त्याच्या प्रसादामुळे, **परां शांतिं** – परम शांती, **शाश्वतं स्थानं च** – नित्य स्थानाला, **प्राप्स्यसि** – प्राप्त होशील. (१८.६२)

(३९) **इति** – याप्रमाणे, **मया** – मी, **ते** – तुला, **गुह्यात् गुह्यतरं ज्ञानं** – गुह्याहून अति गुह्य ज्ञान, **आख्यातं** – सांगितले. **एतत्** – याचा, **विमृश्य** – पूर्णपणे विचार करून, मग **यथा इच्छसि** – जशी तुझी इच्छा असेल, जसे तुला वाटेल, **तथा कुरु** – तसे कर. (१८.६३)

(४०) **भूयः** – पुन्हा, **मे** – माझे, **सर्वगुह्यतमं** – सर्व गुह्यांतील अतिशय गुह्य, **परमं वचः** – परम वचन, **शृणु** – ऐक. **मे** – मला, **(त्वं) दृढं इष्टः असि** – तू अत्यंत प्रिय आहेस. **इति ततः** – असे आहे म्हणून, त्यामुळे, **ते हितं वक्ष्यामि** – तुझे हित मी सांगतो. (१८.६४)

(४१) **मन्मनाः भव** – तू माझ्याच मनामध्ये ज्याचे मन आहे, असा हो. **मद्भक्तः भव** – माझाच भक्त हो. **मद्याजी भव** – माझे यजन–पूजन करणारा हो. **मां नमस्कुरु** – मला नमस्कार कर. **ते** – तुला, **सत्यं प्रतिजाने** – मी सत्य प्रतिज्ञा करून सांगतो, **मां एव एष्यसि** – तू मलाच येऊन पोचशील. **मे प्रियः असि** – (कारण) तू मला प्रिय आहेस. (१८.६५)

(४२) **यत् यत्** – जे जे, **विभूतिमत्** – ऐश्वर्ययुक्त, **श्रीमत्** – समृद्धी किंवा कांती यांनी युक्त, **वा** – किंवा, **ऊर्जितं** – बलाढ्य, **सत्त्वं(अस्ति)** – प्राणी किंवा वस्तू आहे; **तत् तत् एव** – ते तेच, **त्वं** – तू, **मम तेजोंऽशसंभवम्** – माझ्या तेजाच्या अंशापासून

झालेले, **अवगच्छ** – जाण, समज. (१०.४१)

(४३) **यथा** – ज्याप्रमाणे, **सर्वत्रगः** – सर्व जागी जाणारा, संचार करणारा, **महान् वायुः** – मोठा वायू, **नित्यं आकाशस्थितः** – नेहमी आकाशाच्या ठायी असतो, **तथा** त्याप्रमाणे, **सर्वाणि भूतानि** – सर्व भूते, (निर्माण झालेले प्राणिमात्र) **मत्स्थानि** – माझ्या ठायी स्थित आहेत; **इति उपधारय** – असा निश्चय कर; असे समज. (९.६)

(४४) **तु** – पण, [**त्वं** – तू] **मां** – मला, **अनेन एव** – याच, **स्वचक्षुषा** – आपल्या नेत्रांनी, चर्मचक्षूंनी, **द्रष्टुं न शक्यसे** – पाहण्यास समर्थ होणार नाहीस. **ते** – तुला, **दिव्यं चक्षुः** – दिव्य दृष्टी, **ददामि** – मी देतो. **मे** – माझा, **ऐश्वरं योगं** – ईश्वरसंबंधी, ईश्वरी स्वरूपाचा योग, **पश्य** – पाहा. (११.८)

(४५) **द्रोणं च, भीष्मं च, जयद्रथं च, कर्णं च** – द्रोण, आणि भीष्म, आणि जयद्रथ, आणि कर्ण यांना, **तथा** – तसेच **अन्यान् अपि** – दुसऱ्याही, **मया हतान्** – मी मारलेल्या, **योधवीरान्** – वीर योद्धयांस, **त्वं जहि** – तू ठार कर; **मा व्यथिष्ठाः** – व्यथा पावू नकोस; दुःखीकष्टी होऊ नकोस. **युध्यस्व** – युद्ध कर. **रणे** – रणामध्ये, **सपत्नान्** – शत्रूंना, **जेतासि** – तू जिंकशील. (११.३४)

(४६) **तस्मात्** म्हणून, **त्वं उत्तिष्ठ** – तू ऊठ, **यशः लभस्व** – यश संपादन कर, **शत्रुं जित्वा** – शत्रूंना जिंकून, **समृद्धं राज्यं** – संपन्न राज्य, **भुंक्ष्व** – भोग. **एते** – हे भीष्मादिक, **मया एव** – माझ्याकडूनच, **पूर्वं निहताः** – आधीच मारले गेले आहेत **सव्यसाचिन्** – कुशल धनुर्धर अर्जुना. (जो डाव्या हातानेही शरसंधान अचूकपणे करू शकतो, तो सव्यसाची), **निमित्तमात्रं भव** – तू नुसता निमित्त हो. (११.३३)

(४७) **सर्वाणि कर्माणि** – नित्य–नैमित्तिकादी सर्व कर्मे, **अध्यात्मचेतसा** – विवेकबुद्धीने, आत्मनिष्ठ चित्ताने, (मी अंतर्यामीसाठी सेवकाप्रमाणे कर्मे करीत आहे, अशा भावनेने), **मयि** – माझ्या ठिकाणी, (मज सर्वज्ञ परमेश्वराचे ठिकाणी), **संन्यस्य** – टाकून, अर्पण करून, त्याचप्रमाणे **निराशीः** – आशा सोडून, फलाशारहित होऊन, **निर्ममः** – ममत्वबुद्धी सोडून (देह–पुत्रादिकांविषयीच्या ममतेने रहित), **भूत्वा** – होऊन **विगतज्वरः** – शोक ज्याचा गेला आहे असा होऊन, **युध्यस्व** – युद्ध कर. (३.३०)

(४८) **सर्वधर्मान्** – सर्व धर्म व अधर्म या दोहोंसही, (या दोहोंचाही), **परित्यज्य** – परित्याग करून, **मां एकं** – केवळ मलाच, **शरणं व्रज** – शरण जा. (ये) **अहं** – मी, **त्वा** – तुला, **सर्वपापेभ्यः** – सर्व पापांपासून, **मोक्षयिष्यामि** – सोडवीन; मुक्त करीन. **मा शुचः** – शोक करू नकोस. (१८.६६)

ॐ

यत्र गीताविचारश्च पठनं पाठनं श्रुतम् ।
तत्राहं निश्चितं पृथ्वि निवसामि सदैव हि ।।१।।
गीताश्रयेऽहं तिष्ठामि गीता मे चोत्तमं गृहम् ।
गीताज्ञानमुपाश्रित्य त्रींल्लोकान्पालयाम्यहम् ।।२।।
गीता मे परमा विद्या ब्रह्मरूपा न संशयः ।
अर्धमात्राक्षरा नित्या स्वानिर्वाच्यपदात्मिका ।।३।।
चिदानंदेन कृष्णेन प्रोक्ता स्वमुखतोऽर्जुन ।
वेदत्रयी परानंदा तत्त्वार्थज्ञानसंयुता ।।४।।
गीतार्थं ध्यायते नित्यं कृत्वा कर्माणि भूरिशः ।
जीवन्मुक्तः स विज्ञेयो देहान्ते परमं पदम् ।।५।।
गीतामाश्रित्य बहवो भूभुजो जनकादयः ।
निर्धूतकल्मषा लोके गीता याताः परं पदम् ।।६।।
प्रारब्धं भुज्यमानो हि गीताभ्यासरतः सदा ।
स मुक्तः स सुखी लोके कर्मणा नोपलिप्यते ।।७।।

– भगवान श्रीविष्णुः
(श्रीवराहपुराणे श्रीगीतामाहात्म्यम्)

'आज्ञार्थी गीता'

मराठी अनुवाद :

'गीताई' – आचार्य विनोबा भावे

(१) ऐक हे वाक्य उत्तम

१. निर्वीर्य तू नको होऊ, न शोभे हे मुळी तुज ।
भिकार दुबळी वृत्ति, सोडुनी ऊठ तू कसा ।।

२. ज्याने हे व्यापिले सर्व, तो जाण अविनाश तू ।
नाश त्या नित्य-तत्त्वाचा, कोणीहि न करू शके ।।

३. शीतोष्ण विषय-स्पर्श, सुख-दुःखात घालती ।
करी सहन तू सारे, येती जाती अनित्य ते ।।

४. विनाशी देह हे सारे, बोलिले त्यात शाश्वत ।
नित्य निःसीम तो आत्मा, अर्जुना झुंज ह्यास्तव ।।

५. मेल्याने भोगिसी स्वर्ग, जिंकिल्याने मही–तळ ।
म्हणूनि अर्जुना ऊठ, युद्धात दृढ-निश्चये ।।

६. हानि लाभ सुखे दुःखे, हार जीत करी सम ।
मग युद्धास हो सिद्ध, न लागे पाप ते तुज ।।

७. फिरूनि सांगतो ऐक, वाक्य उत्तम मी तुज ।
राखसी श्रवणीं गोडी, तुझे मी हित इच्छितो ।।

(२) नेमिले ते करी कर्म

८. कर्मातचि तुझा भाग, तो फळात नसो कधी ।
नको कर्म-फळीं हेतु, अकर्मी वासना नको ।।

९. म्हणूनि नित्य नि:संग, करी कर्तव्य कर्म तू ।
नि:संग करिता कर्म, कैवल्य-पद पावतो ।।

१०. निर्मिले वर्ण मी चारी, गुण-कर्मे विभागुनी ।
करुनि सर्व हे जाण, अकर्ता निर्विकार मी ।।

११. नेमिले ते करी कर्म, करणे हेचि थोर की ।
तुझी शरीर-यात्राहि, कर्माविण घडेचि ना ।।

१२. यज्ञार्थ कर्म सोडूनि, लोक हा बांधिला असे ।
यज्ञार्थ आचरी कर्म, अर्जुना, मुक्त संग तू ।।

१३. प्रकृतीपासुनी कर्म, ब्रह्मी प्रकृति राहिली ।
ऐसे व्यापक ते ब्रह्म, यज्ञात भरले सदा ।।

१४. विशेष बोलिले वेदे, असे यज्ञ अनेक हे ।
कर्मनि घडिले जाण, जाणूनि सुटशील तू ।।

१५. केली कर्मे मुमुक्षूंनी, पूर्वी हे तत्त्व जाणुनी ।
तैसी तूहि करी कर्मे, त्यांचा घेऊनि तो धडा ।।

(३) योग कर्मात कौशल

१६. फळ लाभो न लाभो, तू नि:संग सम होउनी ।
योगयुक्त करी कर्मे, योग-सार समत्वचि ।

१७. समत्व-बुद्धि ही थोर, कर्म तीहूनि हीन चि ।
बुद्धिचा आसरा घे तू, मागती फळ दीन ते ।।

१८. येथे समत्वबुद्धीने, टळे सुकृत-दुष्कृत ।
समत्व जोड ह्यासाठी, ते चि कर्मात कौशल ।।

१९. म्हणूनि अंतरातील, अज्ञानकृत संशय ।
तोडुनि ज्ञान-खड्गाने, ऊठ तू योग साधुनी ।।

२०. संन्यास म्हणती ज्यास, योग तो जाण पांडवा ।
सोडिल्याविण संकल्प, कोणी योगी न होतसे ।।

२१. असे हे मार्ग जाणूनि, योगी मोह न पावतो ।
म्हणूनि सर्वदा राहे, योगाने जोडिला चि तू ।।

२२. ज्ञानी, तापस, कर्मिष्ठ ह्या सर्वांहूनि आगळा ।
मानिला तो असे योगी, योगी होई म्हणूनि तू ।।

२३. म्हणूनि आदरी शास्त्र, कार्याकार्य कळावया ।
शास्त्राचे वाक्य जाणूनि, इथे तू कर्म आचरी ।।

(४) ते वैरी जाण तू इथे

२४. काम हा, आणि हा क्रोध, घडिला जो रजोगुणे ।
मोठा खादाड पापिष्ठ, तो वैरी जाण तू इथे ।।

२५. म्हणूनि पहिला धारा इंद्रिये ती चि जिंकुनी ।
टाळी पाप्यास जो नाशी ज्ञान-विज्ञान सर्वहि ।।

२६. (इंद्रिये बोलिली थोर, मन त्यांहूनि थोर ते ।
बुद्धि थोर मनाहूनि, थोर तीहूनि तो प्रभु ।।)
असा तो प्रभु जाणूनि, आवरी आपआपण ।
संहारी काम हा वैरी, तू गाठूनि परोपरी ।।

(५) मन्मन तू होई

२७. प्रीतीने आसरा माझा, घेउनी योग साधित ।
जाणशील कसे ऐक, समग्र मज निश्चित ।।

२८. म्हणूनि सगळा काळ, मज आठव, झुंज तू ।
मन बुद्धि समर्पूनि, मज निःशंक पावसी ।।

२९. मज मत्पर-वृत्तीने, सर्व कर्मे समर्पुनी ।
समत्व न ढळू देता, चित्त माझ्यात ठेव तू ।।

३०. जे खासी, होमिसी, देसी, जे जे आचरिसी तप ।
जे काही करिसी कर्म, ते करी मज अर्पण ।।

३१. प्रेमाने ध्यास घेऊनि, यजी मज, नमी मज ।
असे जोडूनि आत्म्यास, मिळिती मज मत्पर ।।

३२. असो मोठा दुराचारी, भजे मज अनन्य जो ।
मानावा तो जसा साधु, त्याचा सुंदर निश्चय ।।
शीघ्र तो होय धर्मात्मा, शांति शाश्वत मेळवी ।
जाण निश्चित तू माझा भक्त नाश न पावतो ।।

३३. तेथे ब्रह्मर्षि राजर्षि, ह्यांची गोष्ट कशास ती ।
भज तू मज, आलास लोकी दुःखद, नश्वर ।।

(६) सर्व गूढातले गूढ ऐक तू पुन्हा

३४. मन माझ्यात तू ठेव, बुद्धि माझ्यात राख तू ।
म्हणजे मग निःशंक, मीचि होशील तू स्वये ।।

३५. जाईल जड माझ्यात, चित्तास करणे स्थिर ।
तरी अभ्यास-योगाने, इच्छुनि मज मेळवी ।।

३६. अभ्यास हि नव्हे साध्य, तरी मत्कर्म आचरी ।
मिळेल तुज ती सिद्धि, सत्कर्म हि करूनिया ।।

३७. न घडे हे असे कर्म, योग माझ्यात साधुनी ।
तरी सर्वचि कर्मांचे, प्रयत्ने फळ सोड तू ।।

३८. त्याने चि सर्वभावे तू जाई शरण, पावसी ।
त्याच्या कृपा-बळे थोर, शांतीचे स्थान शाश्वत ।।

३९. असे गूढाहुनी गूढ, बोलिलो ज्ञान मी तुज ।
ध्यानी घेऊनि ते सारे, स्वेच्छेने योग्य ते करी ।।

४०. सर्व गूढातले गूढ पुन्हा उत्तम वाक्य हे ।
हितार्थ सांगतो ऐक, फार आवडसी मज ।।

४१. प्रेमाने ध्यास घेऊनि यजी मज, नमी मज ।
प्रिय तू मिळसी माते, प्रतिज्ञा जाण सत्य ही ।।

४२. विभूक्तियुक्त जी वस्तु लक्ष्मीवंत उदात्त वा ।
माझ्याचि किरणांतूनि, निघाली जाण ती असे ।।

४३. आकाशात महावायु, सदा सर्वत्र राहतो ।
माझ्यात सगळी भूते, राहती जाण तू तशी ।।

(७) झुंज तू सुखे

४४. परी तू चर्मचक्षूने, पाहू न शकसी मज ।
घे दिव्य दृष्टि ही, माझा ईश्वरी योग तू पहा ।।

४५. द्रोणास भीष्मास जयद्रथास ।
कर्णादि वीरांस रणांगणात ।
मी मारिलेल्यांस फिरुनि मारी,
नि:शंक झुंज, जय तो तुझाचि ।।

४६. म्हणूनि तू ऊठ मिळीव कीर्ती ।
जिंकूनि निष्कंटक राज्य भोगी ।।
मी मारले हे सगळेचि आधी !
निमित्त हो केवळ सव्यसाची ।।

४७. मम अध्यात्मवृत्तीने, सर्व कर्मे समर्पुनी ।
फलाशा ममता सर्व, सोडुनी झुंज तू सुखे ।।

(८) जाळीन सर्व मी पापे

४८. सगळे धर्म सोडूनि, एका शरण ये मज ।
जाळीन सर्व मी पापे तुझी शोक करू नको ।।

'आज्ञार्थी गीते'चा भावार्थ

कर्म आणि अकर्म, धर्म आणि अधर्म यासंबंधी अर्जुनाच्या मनाला पडलेला मोह दूर करण्यासाठी 'गीता' सांगितली गेली. अर्जुनाला आपल्यावर ओढवणाऱ्या दोन महापातकांचं भय होतं. (१) स्वजनांच्या हत्येचं पाप आणि (२) कुलक्षयाचं पाप. ह्या दोन्हीचं खरं स्वरूप काय आहे, ते स्पष्ट करून, अर्जुनाला स्वधर्माचरणास प्रवृत्त करून, ते त्याकडून करवून घेणं, ही श्रीकृष्णावर परिस्थितीनं टाकलेली जणू जबाबदारीच होती. अर्जुन श्रीकृष्णाला सांगतो, विनवतो की, " मानसिक दौर्बल्यामुळं माझी नैसर्गिक वृत्ती नष्ट होऊन धर्म–अधर्म जाणण्यास माझं मन असमर्थ झालं आहे; म्हणून मी तुला विचारतो, की जे खरोखरच श्रेयस्कर असेल ते मला सांग. मी तुझा शिष्य आहे; मला शरणागताला उपदेश कर."*

तेव्हा 'गीते'तील बहुसंख्य आज्ञा ह्या, "अर्जुना, हे मोहपटल अनाठायी आहे; ते टाकून देऊन, तू ऊठ, आणि युद्ध कर;" अशाच आहेत. त्या कर्मयोगपर आहेत. हा कर्मयोग पापकारक न होता, पुण्यप्रद कसा होतो हे विशद करून दाखविण्याचीही जबाबदारी श्रीकृष्णावर पडते. 'गीता' अखेर निष्काम कर्मयोगासह भक्तिनिष्ठेत परिणत होते. 'आज्ञार्थी गीते'चा हा भावार्थ आहे.

पहिला प्रश्न स्वजनहत्येचा. येथे कोणी जन्मत नाही आणि कोणी मृत्यू पावत नाहीं; तत्त्वतः सारं अज आणि अक्षर आहे. तेव्हा हत्येचा इथं संभवच नाही. अंत आहे तो देहाला; पदार्थमात्राला. आत्मा अमर आहे, हे त्याचं उत्तर.

पण देह धारण करून जो येतो त्याला कर्म अटळ आहे. जर ते अटळ आहे, तर ते योग्य रीतीनं, योग्य हेतूनं करावं. सृष्टी निर्माण केली, तेव्हा सृष्टीच्या धारण–पोषणासाठी परमेश्वरानं यज्ञसंस्था–म्हणजे आवश्यक व अटळ कर्मांची

---

* कार्पण्यदोषोपहतस्वभावः । पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः । यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे । शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥ (अ. २.७)

व्यवस्था–निर्माण केली. ज्ञानोपासना, शौर्योपासना, कृषि–वाणिज्यवर्धन, आणि सेवा–शुश्रूषा ही समाजधारणेसाठी अवश्यमेव कर्तव्य–कर्म होत. त्यासाठी चातुर्वर्ण्यव्यवस्था सिद्ध करण्यात आली. वर्ण हा जन्मानं येत नसून तो गुण–कर्मानं येतो. त्यामुळं ईश्वर हा त्याचा कर्ता नाही. वर्णानं–म्हणजे गुणकर्मानं येणारं कर्तव्य प्रत्येकानं करायचं असतं. वर्णविहित कर्मास 'नियमकर्म' किंवा 'स्वधर्म' असं म्हणतात.

कर्म म्हटलं की त्याचं फळ आलंच; आणि फळ म्हटलं की ते पुढील कर्म घेऊन येणारच. अशी कर्म–फळ–कर्म.... ही शृंखला आहे. या कर्मबंधातून मुक्त व्हायचं तर कर्मफलातून मुक्त व्हावं लागतं. म्हणजे निष्काम कर्मयोग आचरायला पाहिजे. कर्म करणं हे आपल्या अधिकारातलं आहे; पण कर्माचं फळ हे आपल्या अधिकारातलं नाही; हा कर्मयोगाचा बीजमंत्र आहे. असक्त बुद्धीनं, मुक्तसंग वृत्तीनं केलेलं कर्म पुण्यप्रद असतं; ते मोचक असतं. शास्त्रविहित स्वधर्माचरण हे व्यक्तीला व अंती समाजाला मोक्षदायक होतं. स्वधर्माचरण हे पुण्य आणि परधर्माचरण हे पाप होय.

कर्म करायचं ते योगयुक्त होऊन. समत्व म्हणजे योग. कर्मफलाची आसक्ती सोडून, यशापयशाविषयी समबुद्धी ठेवणं व तसं आचरण करणं याला 'समत्वबुद्धी' म्हणतात. अशा समत्वबुद्धीनं कर्म करणारा पाप व पुण्य या दोहोंचाही त्याग करतो. कर्माचरणात हा समत्वबुद्धियोग साधणं, हे खरं कौशल्य आहे. योग म्हणजे कर्मकौशल्य! वर्णविहित कर्म करतानाही ते शास्त्राधारे करावं, म्हणजे सुख आणि उत्तम गती प्राप्त होते.

"चांगली जाणती माणसंही स्वधर्माचरण सोडून परधर्माचरण–पापाचरण करताना दिसतात ते का?" असं अर्जुनानं विचारलं, तेव्हा श्रीकृष्ण सांगतात, "रजोगुणातून जन्मणारे काम आणि क्रोध हे महाखादाड आणि न आटोपणारे, अनावर असे शत्रू आहेत. ते माणसाला पापाकडं खेचून नेतात. ज्ञान–विज्ञानाचा नाश करतात. तेव्हा प्रथम इंद्रियांचं संयमन कर, म्हणजे या पाप्यांना तू ठार करू शकशील." अहंकाराचं विसर्जन झाल्याखेरीज माणूस रजोगुण–तमोगुणातून सुटत नाही; तेव्हा ते करणं प्रथम अत्यावश्यक आहे.

अहंकार–विसर्जन जर करायचं असेल तर परमेश्वरार्पित मनोबुद्धीनं वागलं पाहिजे. मनानं सर्व कर्म ईश्वरार्पण करून, ईश्वरपरायण होऊन, समत्व – बुद्धियोगाचा आश्रय करून, ईश्वराच्या ठायी चित्ताचा अखंड लय साधला

पाहिजे. आपण जे करतो, जे खातो, जे दान करतो, तप करतो ते सारं परमेश्वराला अर्पण करता आलं पाहिजे. श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, "तू माझा आश्रय घे, माझ्यावर मन आसक्त कर, माझ्या ठायी ते स्थिर कर; ते मला अर्पण कर, तू मन्मनच हो!" दुराचारी पुरुष जर परमेश्वरावर अनन्यभक्तिभावनेनं मन केन्द्रित करू लागेल, तर तोही अल्पकाळातच धर्मात्मा होऊन शाश्वत शांती मिळवू शकतो.

परमेश्वराचे ठायी चित्त स्थिर करणं, स्थिर होणं प्रारंभी शक्य होत नाही; पण अभ्यासयोगानं ते जमू शकतं. 'अभ्यासयोग' म्हणजे पुनः पुन्हा प्रयत्न करून पाहणं. हे जमत नसेल तर कर्म जी करायची ती ईश्वरासाठी, ईश्वरभावनेनं करीत राह्यची. अशी कामं माणसाला कर्मबंधातून मुक्त करीत जातात. हेही शक्य होत नसेल तर सर्वकर्मांच्या फळांचा त्याग करण्याचं त्यानं शिकावं. अभ्यासाहून ज्ञान श्रेष्ठ; ज्ञानाहून ध्यान श्रेष्ठ आणि ध्यानाहून कर्मफलत्याग श्रेष्ठ होय. तेव्हा अंतर्यामी असणाऱ्या ईश्वराला समभावे शरण जाण्यानं, परमशांती आणि शाश्वत स्थान लाभतं.

भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला दिव्य चक्षू देऊन आपलं विश्वरूपदर्शन दिलं. या दर्शनानं परमेश्वर विश्वाच्या अणुरेणूत भरलेला आहे आणि सारं विश्व परमेश्वरामध्ये अंतर्लीन झालेलं आहे, याचा अर्जुनाला साक्षात प्रत्यय आला; तसंच सारं भूतजात – द्रोण–भीष्मादी सारे – ईश्वराच्या उदरात गडप झाले आहेत.... आधीच ते 'निहत' झालेले आहेत; तेव्हा त्यांना मारण्याचा, व ते मारले म्हणून लागणाऱ्या पातकाचा प्रश्नच उपस्थित होत नाही, याचीही खात्री पटली; तेव्हा फलाशा सोडून सर्व कर्मं परमेश्वरार्पण केली असता ती बंधक ठरत नाहीत; हे ध्यानी घेऊन अर्जुनाला युद्धात उभं राह्यला काही अडथळा राहिला नाही. 'युध्यस्व विगतज्वरः' म्हणजे शंका, मोह, भ्रम यांचा मानसिक ताप क्लेश, व्यथा दूर करून युद्ध कर, असा श्रीकृष्णांनी अर्जुनास आदेश केला आहे.*

श्रीकृष्णाज्ञांचं सार अखेरच्या एका श्लोकात एकवटलेलं आहे. "सर्व धर्म सोडून तू मला एकट्याला शरण ये; मी तुला सर्व पातकांपासून मुक्त करीन. तू

---

* 'ज्ञानेश्वरी'तील याचं शब्दचित्र पाहा :
आतां कोदंड घेऊनि हातीं । आरूढ पां इयें रथीं । देईं आलिंगन वीर वृत्ती । समाधानें ।। जगीं कीर्ति रूढवीं । स्वधर्माचा मानु वाढवीं । इया भारापासोनि सोडवी । मेदिनी हे ।। आता पार्था निःशंकु होईं । या संग्रामा चित्त देईं । एथ हें वांचूनि कांही । बोलों नये ।। (ज्ञा. अ. ३–१८९–१९१)

आपला शोक सोडून दे;'' या श्रीकृष्णोक्तीत हे सार एकघन झालं आहे. हे भक्तिवचन आहे; एकनिष्ठ भक्तीचं, परमोत्कट हे रूप आहे. ज्ञानेश्वरांनी यावर केलेलं भाष्य पाहावं– श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, ''दिवस नसला म्हणजे मृगजळ जसं आपोआप नाहीसं होतं, किंवा काष्ठांचा त्याग केला म्हणजे अग्नीचा जसा त्याग होतो, तसं धर्माधर्म भासविणारं जे अज्ञान, ते टाकून दिलं म्हणजे सर्व धर्म आपोआप जातात, आणि मी सहज एकटाच उरतो. आपलेपणाचा भेद न ठेवून, माझं हे एकत्व जाणणं, ह्यालाच 'मला शरण येणं' असं म्हणतात. घटोपाधीनं घटाकाश वेगळं दिसतं व घटनाश झाल्यावर ते महाकाशात ऐक्य पावतं; तसं तुझं मला शरण येणं, हे तुझं व माझं ऐक्य घडवतं. प्रथम तू 'मी' हो, आणि मग माझी भक्तीही 'सहजा' होईल, अशी भक्ती, तू प्राप्त करून घे. अद्वितीयबोधानं तू मला शरण आल्यावर, तुला धर्माधर्मांचा स्पर्श होणार नाही.''

पुढं श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, ''सूर्याला जसा अंधार भेटत नाही, तसं माझ्याशी ऐक्य पावल्यावर (सर्वरूप असा जो मी), त्या माझ्यावाचून दुसरं काही उरत नाही. तेव्हा पाप–पुण्याची, धर्माधर्मांची चिंता करू नकोस. तुझं पाप आणि तुझं पुण्य मीच होईन. माझ्याहून भिन्नपणानं उरणं, म्हणजेच पाप होय; माझ्याशी एकरूप झाल्यानं हे पाप उरतच नाही. एकमेवाद्वितीय असा जो मी, त्या मला तू शरण ये.''

ज्ञानेश्वरांनी यानंतर श्रीकृष्णार्जुनाच्या अद्वैत मिलनाचं अपूर्व भावदर्शन घडविलं आहे. बुद्धीला व शब्दाला आकलन न होणारं आपलं स्वरूप, अर्जुनाला देण्याकरता श्रीकृष्णांनी आलिंगनाचं निमित्त केलं, हृदयाला हृदय मिळताच श्रीकृष्णांनी आपल्या हृदयातील ज्ञान अर्जुनाच्या हृदयात घातलं, आणि देवभक्तांचं द्वैत न मोडता, अर्जुनास आत्मरूप केलं. समुद्रास समुद्र मिळाल्यावर पाणी दुप्पट वाढून पुरवणीला आकाश घ्यावं लागतं, तसं श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या आलिंगनाचं प्रेम दोघांनाही आवरेना. सर्व विश्व नारायणरूप होऊन गेलं.*

मूळ गीता, ज्ञानेश्वरी किंवा ही आज्ञार्थी गीता अशा तऱ्हेनं ज्ञानोत्तर कर्मयोगातून सहजरूप भक्तियोगात परिणत होते; निमज्जित होते.

---

* मग सावळा सकंकणु । बाहु पसरोनि दक्षिणु । आलिंगिला स्वशरणु । भक्तराजु तो ॥१४१८॥ हृदया हृदय एक जालें । ये हृदयींचे ते हृदयीं घातलें । द्वैत न मोडितां केलें । आपणा ऐसें अर्जुना ॥१४२१॥ दीपें दीपु लाविला । तैसा परिष्वंगु तो जाला । द्वैत न मोडिता केला । आपणपें पार्थु ॥१४२२॥ सिंधु सिंधुतें पावों जाये । तें पावणें ठाके दुणा होये । वरी रिगे पुरवणिये । आकाशाही ॥१४२४॥ तैसें तया दोघांचें मिळणें । दोघां नावरे जाणावें कवणें । किंबहुना श्रीनारायणें । विश्व कोंदलें ॥१४२५॥ (ज्ञा. अ.१८)

उपसंहार

अर्जुनापुढील दोन प्रश्नांपैकी स्वजनहत्येच्या पापाचा प्रश्न स्वधर्माचरणाच्या तत्त्वदर्शनानं सुटला; पण त्याचा दुसरा प्रश्न–कुलक्षयाच्या पापासंबंधीचा – त्याचं गीतेनं काय उत्तर दिलं आहे? दिलं आहे की नाही, याचा थोडासा इथं विचार करणं आवश्यक आहे. स्वधर्मपालन वैयक्तिक मोक्षासाठी करायचं, तसंच ते लोकसंग्रहासाठीही करायचं, असं मूळ गीतेनं प्रतिपादलं आहे. (अध्याय ३. १६–२६) स्वधर्मपालन म्हणजे वर्णविहित कर्माचं शास्त्रशुद्ध निष्काम बुद्धीनं आणि ईश्वरार्पण वृत्तीनं केलेलं आचरण, हे आपण पाहयलं आहे, प्रत्येक व्यक्तीनं जर आपापला धर्म अशा निष्ठेनं, योग्य रीतीनं आणि मनःपूर्वकतेनं पाळला तर समाजाची घडी सुव्यवस्थित बसते; समाजाची धारणा निकोपपणे होते आणि समाजाची उन्नती होऊन, सुख–समाधान नांदते. 'लोकसंग्रह' म्हणजे ही निकोप आणि सदैव विकसनशील समाजधारणा होय. तेव्हा स्वधर्मपालनानं स्वरक्षण, स्वकुलरक्षण आणि समाजरक्षण होतं; त्याबरोबरच या तिन्हींचाही परिपोष होऊन समृद्धी लाभते. स्वधर्म सोडून परधर्माचरण करणं हे स्वतःस, तसं कुलास आणि समाजासही हानिकारक आहे. 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' हे गीतावचन आहे. (अ. ३.३५)

हे सारं तत्त्वतः बरोबर आहे, पण प्रत्यक्षात युद्धानंतर अनुभवास काय येतं? उभयपक्ष जवळ जवळ सारखेच उध्वस्त झालेले असतात. जित आणि जेते प्रायः एकाच आर्थिक आणि सांस्कृतिक पातळीवर आलेले असतात. मानवसंहार आणि संपत्तीचा (= धन, धान्य, पशू, निसर्ग इत्यादी सर्व गोष्टींचा) विनाश भरून निघायला किती काळ लागेल, किती पिढ्या खर्ची पडतील, ते सांगता न येण्यासारखी स्थिती होते. वर्णसंकर, कुलस्त्रियांची अवहेलना–भ्रष्टता याची कल्पना करवत नाही. या अपरिमित संहाराचं आणि संकराचं या संस्कृति–प्रदूषणाचं उत्तरदायित्त्व कोणावर पडतं? ह्या पातकाचा धनी कोण?

अर्जुन या पातकानंही भ्याला होता. आरपार हादरला होता. त्याचं निश्चित उत्तर गीतेनं दिलं आहे काय? बापूसाहेब माटे यांनी या संदर्भात 'ही गीता अपुरी आहे,' असं स्पष्ट विधान केलं आहे आणि भारतीय युद्धाच्या प्रलयानंतर स्त्रीजीवनाची झालेली होलपट–विटंबना पोटतिडिकेनं मांडली आहे.

आज वर्णाश्रमव्यवस्था आणि वर्णसंकराचं स्वरूप आणि संकट समजून घेण्यासाठी गीतेचा अभ्यास केला जात असेल, असं वाटत नाही. ज्ञानेश्वर हे चातुर्वर्ण्याधिष्ठित स्वधर्म–विचार मांडतात, याबद्दल त्यांच्यावर कडक टीका करणारे, त्यांचा निषेध करणारे लोक आढळतात. पण हे कितपत न्याय्य आहे, ते पाहणं आवश्यक आहे. डॉ. स. रा. गाडगीळ आणि प्रा.गं.बा. सरदार यांनी वस्तुनिष्ठ ऐतिहासिक समीक्षा पद्धतीचा अवलंब करून, गीता आणि ज्ञानेश्वरी यांतील स्वधर्म आणि वर्णधर्म यांचा सांगोपांग परामर्श घेतला आहे. त्याचा इत्यर्थ हा की, ''वर्णव्यवस्था ही प्राचीन हिंदूंची अर्थव्यवस्था आहे. अर्थव्यवस्थेत व्यवसाय– निश्चिती आहे. स्पर्धेवर आधारलेली अर्थव्यवस्था उदयाला येईतो, व्यवसाय– निश्चितीवर आधारलेली वर्णव्यवस्था कोणालाही मोडणं शक्य नव्हतं. एकोणिसाव्या शतकात पाश्चात्त्य संस्कृतीबरोबर नवीन अर्थव्यवस्था इथं येईतो जुनी वर्णव्यवस्था झुगारून देणं शक्य नव्हतं. ज्ञानेश्वरादी संतांनी वर्णव्यवस्थेतील उच्चनीचतेच्या कल्पनेचा निषेध केला आहे, पण समाजव्यवस्थाच उध्वस्त व्हावी, हे त्यांना मान्य नव्हतं. वर्णव्यवस्थेच्या मुळाशी असलेल्या अर्थव्यवस्थेचा विचार न केल्यामुळं अनेक विचारवंतांनी, आजच्या दृष्टिकोनातून ज्ञानेश्वरादी संतांच्या धोरणावर टीका केली आहे. पण त्यांची ही टीका संपूर्ण अनैतिहासिक आहे.

''मराठी संतांनी धर्मजीवनाच्या शुद्धीकरणाचीच मोहीम हाती घेतली, मूलगामी समाजपरिवर्तनाचा विचार त्यांच्या मनात आला नाही, याबद्दल त्यांना दोष देण्यात अर्थ नाही. शाश्वत नीतिमूल्यांप्रमाणंच स्वधर्मनिष्ठेची व लोकसंग्रहाची आवश्यकता त्यांनी अनेकदा प्रतिपादिली आहे. व्यक्तीच्या परमार्थसिद्धीसाठी सामाजिक व्यवस्थेत बिघाड होणं, योग्य नाही, असं त्यांना वाटत होतं. जिच्यामुळं वृत्तिछेद होईल, उदरनिर्वाहाच्या व्यवसायाची हेळसांड होईल, अशी कोणतीच धर्मसाधना सर्वसामान्य लोकांच्या पचनी पडणार नाही, याची त्यांना कल्पना होती. स्वधर्माची किंवा विहित कर्माची महती गाताना त्यांनी रूढ समाजव्यवस्था प्रमाण मानली.'' तेव्हा ज्ञानेश्वरांच्या

स्वधर्मविचारामध्ये लोकसंग्रहाचा, समाजधारणेचा विचार अनुस्यूत आहे. *

गीता ही युद्धासंबंधी कोणती तात्त्विक भूमिका घेते? कोणत्याही लोककल्याणकारी चिंतकास किंवा तत्त्ववेत्त्यास युद्ध ही आवडणारी गोष्ट नाही. जनसामान्यासही युद्ध नकोच असतं. पण युद्धं अटळ होऊन बसतात. आसुरी वृत्ती जेव्हा बळावत जाते व दैवी संपत्तीचा पदोपदी अवमान–अपमान होत जातो, तेव्हा मानवजातच संकटात येते. अशावेळी शिष्टाई निष्फळ होतात. कृष्ण-शिष्टाई, हनुमंतशिष्टाई सफळ झाली नाही. कवी यशवंतांची 'युगंधराचं पालुपद' ही कविता एक सनातन सत्य सांगते.

जमेच ना, घडेच ना,
बनेच ना, पटेच ना...

विश्वशांती व्हावी, म्हणून बसलेले राष्ट्राग्रणी यांच्यात काही जमेचना... तहनामे झाले... बोरू मेरू–मंदाराचे झिजले... साती समुद्राची शाई आटली.. पण काही 'बनेच ना, पटेच ना?'... अखेर बोरूऐवजी बंदूक हाती घ्यावी लागते व रणशिंग फुंकलं जातं. धर्माचा ऱ्हास होऊन अधर्म माजतो. तेव्हा

'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय ...'

आदिशक्तीलाच उभं करावं लागतं; प्रकट व्हावं लागतं. साधूंचं परित्राण हे क्षात्रकर्तव्य होय. जगातील सत्त्वशीलांचं संरक्षण हे सत्तेचं पहिलं आणि अखेरचं कर्तव्य आहे. कारण सत्त्वगुणाचाच लोप झाला, तर जग दुरिताच्या तिमिरात गडप होऊन जाईल. जगातला सद्धर्म संपला, सज्जनताच संपली, त्याच्या सुरक्षिततेची हमी संपली, तर सारं संपलं. धर्माच्या परिपालनासाठी अधर्माचा नाश करणं जेव्हा अपरिहार्य होतं, तेव्हाच युद्धं होतात. मग इथं संहार अटळ ठरतो, आणि हा संहार धर्म्य ठरतो. भगवंतांनी आत्म्याच्या अमरत्वामुळं कोणीच मृत्यू पावत नाहीत, हे सांगून आध्यात्मिक स्तरावरती कुलक्षयाचा प्रश्न मुळातच

---

* जिज्ञासूंनी डॉ. स. रा. गाडगीळ यांची पुढील पुस्तकं अवश्य पहावीत– (१) 'वैदिक यज्ञ, मध्ययुगीन तंत्रसाधना आणि ज्ञानेश्वरप्रणीत भक्तियोग,' (२) 'प्राचीन व मध्ययुगीन धर्मकल्पना आणि मराठी संत; तसंच या पुस्तकास प्रा. गं.बा. सरदार यांनी लिहिलेली प्रस्तावना अभ्यासावी. प्रा. सरदारांचा 'ज्ञानेश्वरांची धर्मकल्पना' हा निबंधही मननपूर्वक पाहावा.

निकालात काढला आहे. विश्वरूपदर्शनातही ''भीष्म–द्रोण–जयद्रथ– कर्णादी वीरपुरुष मी आधीच मारलेले आहेत, तू निमित्तमात्र हो;' हे त्यांनी अर्जुनास प्रत्यक्ष प्रत्ययास आणून दिलं आहे. पण लौकिक–ऐहिक पातळीवरही लोकसंग्रहासाठी, धर्मसंस्थापनेसाठी स्वधर्माचरण हे आवश्यक आणि अटळ आहे, हेच त्यांनी आवर्जून प्रतिपादिलं आहे. इथं संहार होतो तो आसुरी संस्कृतीचा, आणि रक्षण होतं ते दैवी संस्कृतीचं.

शांतीसाठी होणाऱ्या या युद्धात निष्पाप, निरपराध, लोकांचेही बळी पडतात, त्याचं काय? निष्पाप, निरपराध, गरीब वृत्तीचे लोक आसुरी आणि आततायी सत्तेचे वर्तमानकालात गुलाम झालेलेच असतात; त्यांचे बळी पडतच असतात. त्यांना मुक्त करणं, स्वतंत्र करणं हे धर्मकर्तव्य आहे; यासाठी होणारा रक्तपात सहेतुक नसतो, रक्तपातासाठी केलेला नसतो, हे सांगायचं कारण नाही. धर्मसंस्थापनेसाठी होणारा कुलक्षय आणि स्वजनहत्याही धर्म्य होय; पुण्यकारक होय; कारण उद्याच्या दूरगामी-विशाल आणि व्यापक मानवहितासाठी आज होणारी ती हत्या असते; विश्वमानवाच्या कल्याणाच्या संदर्भात ती अपरिहार्य ठरते. मात्र यामागं वृत्ती धर्मसंस्थापकाची हवी. निष्काम कर्मयोग्याची हवी; ईश्वरार्पणभावाची हवी. अफझलखानाच्या वधानंतर त्याच्या बायकामुलांना संरक्षण देऊन घरी पोचतं करणाऱ्या शिवाजी महाराजांची हवी. वैर आसुरी वृत्तीशी असतं; तिचा निःपात होताच शस्त्राला रजा द्यायची असते. तेव्हा 'स्व'साठी जसं स्वधर्म–पालन, तसंच 'लोककल्याणा'साठीही 'स्व–धर्मपालन' आवश्यक आणि अटळ आहे.

गीता हे उत्तर देते. 'आज्ञार्थी गीते'त हा भाग आलेला नाही. पण विचार–परिपूर्तीसाठी तो देणं अगत्याचं वाटलं, म्हणून इथं दिला आहे! 'गीता' शेवटी सांगते की,

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ।।

कारण हे कर्म सात्त्विक आहे. सत्त्वाचा 'उदयोऽस्तु' करा, ही गीताज्ञा आहे.

शेवटी एक गोष्ट सांगावीशी वाटते. श्रीमद्भगवद्गीता, श्रीज्ञानेश्वरी यासारखे अध्यात्म ग्रंथ; अथवा महाभारत, रामायण, भागवतादी महाकाव्य – पुराणादी ग्रंथ यांचं वाचन–मनन आपण करतो, ते त्यांतील शाश्वत

तत्त्वदर्शनासाठी. हे तत्त्वदर्शन देशकाल– परिस्थितिनिरपेक्ष असतं. ते सर्वत्रांचं, सर्वांचं, सर्वकाळचं असतं. कालबाह्य गोष्टीसाठी या आदिग्रंथांचा विचार होत नसतो; व्हायचं कारणही नसतं. तत्तत्कालीन परिस्थितीचा तपशील घेऊन आलेल्या व ती ती व्यवस्था दर्शविणाऱ्या गोष्टी कालानुसारे संपत जातात; पण त्यामागील तत्त्वदर्शी प्रभामंडल हे अखंड प्रकाशनदान करीत असतं; विश्वमानवाच्या जीवनाचं नियमन आणि मार्गदर्शन करीत असतं. चातुर्वर्ण्य – विचारासाठी आणि वर्णसंकराच्या पापमुक्तीसाठी, किंवा पितर लुप्त–पिंडोदक होऊ नयेत म्हणून करायच्या धर्मक्रियेसाठी गीता किंवा ज्ञानेश्वरी वाचणं, हे आज अप्रस्तुत आहे. चातुर्वर्ण्यादी विचार हे त्या काळाशी संबद्ध आहेत. हे विचार परिवर्तनशील, म्हणून कालपरत्त्वे क्षीण होत जाणारे, नष्ट होऊ शकणारे असतात.* आज बदललेल्या अर्थव्यवस्थेत, राजकारणाच्या लोकशाही आकृतिबंधात आणि सांस्कृतिक स्वातंत्र्यवादात सनातनी चातुर्वर्ण्यविचार कोणी करील, असं वाटत नाही. हा भाग तत्तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात पाहायचा असतो; तारतम्यानं बघायचा असतो.

गीता किंवा ज्ञानेश्वरी 'स्वधर्मा'चं जे प्रतिपादन करते, ते शाश्वत महत्त्वाचं आहे. 'स्व–धर्म–विचार' सोडता येईल, किंवा सुटावा, असं म्हणता येणार नाही. 'स्व–धर्म' सुटला तर समाज फुटला, राष्ट्र रसातळाला गेलं, असं अनुभवास येईल; येतंच! 'स्व–धर्म' म्हणजे 'आपलं कर्तव्य–कर्म'! Duty. आपणांस 'Do your duty, come what may', हे माहीत असतं; ते मान्य असतं. 'स्वधर्मे निधनं श्रेयः' याचंच ते आंग्लभाषीय रूप आहे. 'स्वधर्मे निधनं श्रेयः' म्हणजे आपल्या हिंदुधर्मात, बौद्ध धर्मात, मुसलमान धर्मात किंवा खिश्चन धर्मात, असं नव्हे. गीतेच्या निर्मितिकाली हे धर्म अस्तित्वातही नव्हते; हे इथं ध्यानी घ्यावं. गीता–ज्ञानेश्वरी निःसंदिग्धपणे सांगते ते नियत कर्म, निःसंगपणे करीत राहा; कारण ते 'सात्त्विक' असतं; त्यानंच जगात सात्त्विकतेचं साम्राज्य नांदेल.

नियतं संगरहितं अरागद्वेषतः कृतम् ।
अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते ।।

---

* धर्माचे 'यम' आणि 'नियम' असे दोन भाग असतात. 'यम' हा शाश्वत, अपरिवर्तनीय, नित्य भाग होय; आणि 'नियम' हा देशकालपरिस्थितिसापेक्ष परिवर्तनशील भाग होय. चातुर्वर्ण्यादी विचार 'नियम–भागा'त येतात.

या सात्त्विकतेचा उदय, उत्कर्ष आणि परिरक्षण करणं ही लौकिकाच्या संदर्भात भगवान श्रीकृष्णाची 'गीताज्ञा' आहे; हे तिचं मूलसूत्र आहे.

"Let your life be a continuous process of yoga. Efficiency in action is yoga. Serving without bondage is yoga. Selfless work is yoga. Balance of mind is yoga. Ethical perfection is yoga. Meditation is yoga. Emotional integration is yoga. Pure devotion is yoga. Enlightenment is yoga. Cosmic consciousness is yoga.

Swami Shivanand
75th Birthday Message
8th september, 1961.

परिशिष्टे

भगवान श्रीकृष्ण,
भगवद्‌गीता,
आणि कर्मयोग

परिशिष्ट–१

'आज्ञार्थी गीते'च्या संदर्भात स्वामी विवेकानंद यांचे भगवान श्रीकृष्ण, भगवद्‌गीता आणि कर्मयोग यासंबंधीचे विचार समजून घेणं उद्‌बोधक ठरेल. नागपूर येथील रामकृष्ण मठानं १९८३ मध्ये स्वामी विवेकानंदांची ग्रंथावली जी प्रसिद्ध केली, तीमधील 'भगवान श्रीकृष्ण आणि भगवद्‌गीता', व 'कर्मयोग' या पुस्तकांतील स्वामी विवेकानंदांचे विचार त्यांच्याच शब्दांत, साररूपाने इथं ग्रथित केलेले आहेत. मुळात ही भाषणं असल्यानं स्वामीजी श्रोत्यांना उद्देशून बोलतात, सांगतात. हे भाषणरूपही इथं तसंच ठेवण्यात आलेलं आहे.

स्वामी विवेकानंद म्हणतात –

''भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्णांनी अध्यात्म–ज्ञानाचा सुस्पष्ट उपदेश केला आहे. हे महान काव्य भारतीय वाङ्‌मयाचा मुकुटमणी समजलं जातं. ते वेदावरील एक प्रकारचं भाष्य आहे. गीता आपल्याला शिकवते, की आध्यात्मिकता प्राप्त करून घेण्यासाठी, या जीवनातच आपल्याला लढा दिला पाहिजे; म्हणून जीवनापासून आपण पळ काढता कामा नये. उलट त्याच्यापासून जे काही मिळवता येईल; ते मिळविण्यासाठी झटलं पाहिजे. उच्च गोष्टींच्या लाभासाठी केल्या जाणाऱ्या संघर्षाचं गीता हे प्रतीक असल्यामुळं, ती युद्धक्षेत्रावर सांगितली गेली, ही घटनाच मोठी काव्यात्मक आहे. एका पक्षाचा नेता जो अर्जुन, त्याचं सारथ्य करीत असलेले श्रीकृष्ण, त्याला दुःखी न होण्याचा, मृत्यूला न भिण्याचा उपदेश करतात. याचं कारण हे की, आत्मा अमर आहे, हे त्यांना माहीत होतं आणि जे काही परिवर्तनशील आहे, ते मानवाचं खरं स्वरूप असू शकत नाही, हेही ते जाणत होते. एकामागून एक अशा अनेक अध्यायांत श्रीकृष्ण अर्जुनाला तत्त्वज्ञान व धर्म यांमधील उच्च सत्यांचा उपदेश करतात.

ह्या उपदेशामुळेच हे काव्य इतकं सुंदर बनलं आहे.

''वेदान्ताचं प्रायः समग्र तत्त्वज्ञानच गीतेत समाविष्ट झालं आहे. वेद सांगतात की आत्मा अनंत असून, शरीराच्या मृत्यूचा त्याच्यावर काहीही परिणाम होत नाही. आत्मा हे असं एक वर्तुळ आहे की, ज्याला परीघ नाही, पण ज्याचा मध्यबिंदू मात्र कोणत्या ना कोणत्या देहात–शरीरात–असतो. मृत्यू–तथाकथित मृत्यू, म्हणजे केवळ या मध्यबिंदूचं स्थानांतर होय. ईश्वर हे असं एक वर्तुळ आहे की ज्याचा परीघ कोठेही नाही, पण ज्याचा मध्यबिंदू सर्वत्र आहे; आणि जेव्हा आपण सीमित देहाच्या मध्यबिंदूतून बाहेर पडू, तेव्हाच आपल्याला ईश्वराचा म्हणजे आपल्या खऱ्या स्वरूपाचा साक्षात्कार होईल.*

स्वामी विवेकानंद पुढे म्हणतात, ''कर्मयोगाचं तत्त्व समजून घ्यायचं झाल्यास 'कर्तव्य' म्हणजे काय, हे प्रथम कळणं आवश्यक आहे. पण कोणत्याही सामान्य भाववाचक शब्दाप्रमाणेच 'कर्तव्य' या शब्दाचीही रेखीव, सुबोध व्याख्या करणं दुष्कर आहे. त्याचं प्रत्यक्ष कार्य आणि फल पाहूनच आपण त्याच्यासंबंधी काही धारणा करू शकतो, इतकंच. भगवद्‌गीता ही जन्मगत आणि अवस्थागत कर्तव्याचा वारंवार उल्लेख करते. आपण कोणत्या समाजात जन्म घेतला आहे आणि कोणत्या अवस्थेत आपण आहोत, यावरूनच जीवनातील विभिन्न कर्तव्यांकडं आपण कोणत्या वृत्तीनं पाहू, हे बहुतांशी ठरत असतं. ह्याच कारणास्तव स्वतःच्या सामाजिक अवस्थेशी सुसंगत आणि त्याचबरोबर हृदयाची आणि मनाची उन्नती करील, असं कार्य आपण करीत जाणं उचित आहे; तेच आपलं कर्तव्य होय.

''परंतु, खरंखुरं कर्तव्य कोणतं असेल तर ते हेच की आपण अनासक्त होऊन, स्वाधीन वृत्तीनं कर्म केलं पाहिजे. अखिल कर्मांची पुष्पांजली प्रभुचरणी वाहिली पाहिजे. आपली सर्व कर्तव्यं वस्तुतः आपली नसून ती त्याचीच आहेत. आपण या जगात – त्याच्या लीलाभूमीत–आहोत, हे आपलं खरोखरी सौभाग्य होय. आपण आपलं कार्य करीत आहोत, इतकंच. ते चांगल्या तऱ्हेनं पार पडत आहे की कसं, कुणास ठाऊक! चांगल्या तऱ्हेनं झालं तरी, आपल्याला त्याच्या फळाची आस नाही. वाईट रीतीनं घडलं तरी त्याची खंत नाही. स्वाधीन भावानं शांतपणानं कार्य करणं हे मुळात आवश्यक. ही अवस्था लाभणं, असली स्वाधीनता प्राप्त होणं, अत्यंत अवघड गोष्ट आहे.

या संदर्भात स्वामी विवेकानंद 'मुक्ती' संबंधी विचार मांडतात. ''मुक्ती म्हणजे अगदी संपूर्ण स्वाधीनता; अशुभ बंधनांतून, तशीच शुभ बंधनांतून सुटका; कारण

---

* 'भगवान श्रीकृष्ण आणि भगवद्‌गीता' – स्वामी विवेकानंद, प्रका. रामकृष्ण मठ, नागपूर, आवृत्ती ५ वी, १९८३. पृष्ठ : ४९–५०

साखळी—मग ती लोखंडाची असो की सोन्याची – साखळी ती साखळीच! समजा, माझ्या बोटात एक काटा रुतला आणि तो मी दुसऱ्या काट्याने काढून टाकला. काटा काढून झाल्यावर मग ते दोन्ही काटे मी फेकून देईन. तो दुसरा काटा ठेवून घेण्याची मला काहीच गरज नाही. कारण अखेरीस दोन्ही काटेच ना? अशुभ संस्कारांचा शुभ संस्कारांद्वारा असाच नाश केला पाहिजे, जोपर्यंत सगळंच्या सगळं वाईट, लुप्तप्राय होत नाही, अथवा जिंकलं जात नाही, किंवा वशीभूत होऊन मनाच्या एका कोपऱ्यात पडून राहत नाही, तोपर्यंत मनावरील कुसंस्कार पुसून टाकत राहून, त्यावर शुभसंस्कार करीत गेलं पाहिजे. परंतु त्यानंतर मग, शुभ संस्कारांवरही जय मिळवावा लागेल. तेव्हाच जो 'आसक्त' होता, तो 'अनासक्त' होऊन जाईल.

यासाठी स्वामीजी सांगतात, ''स्वतः शांतभावानं राहून, आपण आपलं शरीर, आपलं मन, आपलं सर्वस्व, भगवंताच्या पादपद्मी हविर्द्रव्य म्हणून प्रदान करा. होमाग्नीत घृताहुती प्रदान करण्याऐवजी, अहोरात्र या क्षुद्र 'अहं'ची आहुती देण्याचा 'अहंमेध' नामक महायज्ञ करा. मग आधीचं ते क्षुद्रत्व—क्षुद्रव्यक्तित्व पूर्णपणे लयास जाईल, आणि तुम्ही अनंत स्वरूप व्हाल. ही अनंतत्वाची प्राप्तीच, वस्तुतः सर्व धर्मांचं आणि सर्व तात्त्विक व नैतिक उपदेशांचं एकमेव लक्ष्य होय. विश्वात्मैक्यच अंतिम लक्ष्य होय. हीच मुक्ती. ह्या मुक्तीचा निःस्वार्थ कर्माच्या द्वारे लाभ करून घेणं हाच 'कर्मयोग' होय.

''कर्मयोग म्हणजे निःस्वार्थपरता व सत्कर्म यांच्या द्वारा मुक्तिलाभ करून घेण्याची एक विशिष्ट नैतिक आणि धार्मिक प्रणाली होय. कर्मयोग्याचा कोणत्याही प्रकारच्या धर्ममतावर विश्वास असण्याची गरज नाही. फार काय, पण प्रत्यक्ष ईश्वरावरही त्याचा विश्वास नसला तरीसुद्धा काहीही अडावयाचं नाही. तो आत्म्याचं अनुसंधान करो, वा न करो; कोणत्याही प्रकारचं तात्त्विक चिंतन करो, वा न करो; कशानंही काही बिघडणार नाही. त्याच्यासमोर निःस्वार्थतेची प्राप्ती, हे त्याचं स्वतःचं, असं एक विशिष्ट ध्येय असतं, आणि ते त्याला स्वतःच्या प्रयत्नांनीच प्राप्त करून घ्यावयाचं असतं.

''आपण या जगातील सुखाची वाढ करू शकत नाही, किंवा त्यातील दुःखातही भर घालू शकत नाही. जगातील व्यक्त शक्तीची गोळाबेरीज नेहमी सारखीच राहणार. आपण तिला फक्त इकडून तिकडं आणि तिकडून इकडं ढकलत असतो. परंतु ती नेहमी समानच राहील; कारण हा तिचा गुणधर्मच आहे. ही भरती आणि ओहोटी, हा चढ—उतार मुळी जगाचा स्वभावच आहे. 'पण वस्तुस्थिती ही अशी नाही,' असं म्हणणं, म्हणजे मृत्युशून्य जीवन असू शकतं, असं म्हणण्यासारखं तर्कविसंगत आहे. मृत्युशून्य जीवन जर खरोखरच अस्तित्वात येऊ शकलं, तरच आपण उत्थानाला पतनाहून अलग

करू शकू. परंतु 'मृत्युशून्य जीवन', म्हणजे अर्थशून्य बडबड किंवा वदतोव्याघातच होय, कारण जीवन म्हणजेच सतत मृत्यू. हा दिवा सारखा 'जळत' आहे, पण तेच त्याचं 'जगणं' आहे. जीवन हवं असेल तर त्यासाठी प्रतिक्षणी मरावं लागेल. जीवन आणि मृत्यू ही एकाच गोष्टीची दोन विभिन्न रूपं होत. भिन्न दृष्टिकोनांतून पाहिल्यामुळंच ती भिन्नभिन्न वाटत असतात. जीवन आणि मृत्यू म्हणजे एकाच लाटेचं उत्थान आणि पतन होत, आणि दोहोंची मिळूनच एक पूर्ण वस्तू होत असते. कुणी 'पतना'कडे पाहतो आणि निराशावादी बनतो, तर कुणी 'उत्थाना'कडं पाहून आशावादी होतो.

''स्वमतांधता आणि दुराग्रह टाळला तरच खरंखरं कार्य करण्याची पात्रता अंगी येते. जो सहजासहजी वाहवत नाही, जो शांत प्रकृतीचा असतो, सर्व बाजूंनी सारासार विचार करून कार्य करण्याचा ज्याचा स्वभाव आहे, ज्याचे ज्ञानतंतू सहजासहजी उत्तेजित होत नसतात आणि जो निरतिशय प्रेम आणि सहानुभूतिसंपन्न असतो, तोच मनुष्य या जगात महत् कार्य करून, तद्वारा स्वतःचेही कल्याण साधू शकत असतो. स्वमतांध लोक जगाचं कल्याण तर करू शकतच नाहीत, पण स्वतःही पवित्रता व पूर्णता प्राप्त करून घेण्यास ते अपात्र ठरतात.

हे जग नेहमीच शुभाशुभाचं मिश्रण असणार. आमचं कर्तव्य हेच की, दुबळ्यांना सहानुभूती दाखविणं आणि कुकर्म करणाऱ्यावरही प्रेम करणं. आपलं हे जग म्हणजे एक विशाल नैतिक व्यायामशाळा आहे. इथं आपणां सर्वांनाच व्यायाम घ्यावा लागतो, की ज्यागुळं आपण दिवसेंदिवस अधिकाधिक बलसंपन्न होत जातो. दुराग्रही धर्मांधता आणि निःस्वार्थ प्रेम एकाच हृदयात कदापि नांदू शकत नाहीत. तेव्हा आपण जितके शांत असू आणि आपले ज्ञानतंतूही जितके शांत राहतील, तितके आपण अधिक प्रेमसंपन्न होऊ आणि तितकेच अधिक चांगले काम करण्यास आपण समर्थ होऊ शकू.

''कर्माचा उद्देश काय? आपल्या पाहण्यात ही गोष्ट आहे, की प्रत्येक देशातील अधिकांश लोकांचा असा विश्वास असतो, की एक समय असा येईल की, सर्व जग पूर्णत्वाला पोहोचेल आणि मग संसारात आधी, व्याधी, मृत्यू, दुःख, दुष्टता काही शिल्लक राहाणार नाही. कल्पना तर मोठी गोंडस आहे आणि ती अजाण लोकांना कार्यास प्रेरित करू शकणारी आहे. परंतु एक क्षणभरच विचार करून बघितल्यास आपल्याला अगदी स्पष्टपणे कळून येईल की, असली अवस्था कधीही येऊ शकणार नाही. कसं शक्य आहे हे? भलं व बुरं म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू ना? भलं घेऊ जाता, त्याचबरोबर बुरंही येणार नाही, हे घडावं कसं? पूर्णत्व म्हणजे काय? पूर्णत्वाचा अर्थ काय आहे? 'पूर्णजीवन' हे शब्दच मुळी विरोधात्मक होत.

''जीवन म्हणजेच प्रत्येक बाह्य वस्तूशी सतत चाललेलं द्वंद्व. आपण प्रतिक्षणी

बहि:प्रकृतीशी दोन हात करीत आहोत. हरलो, की झाली आपल्या जीवनाची इतिश्री! उदाहरणार्थ, अन्न आणि हवा हा जीवनाचा एक पैलू बघाना – अन्न आणि हवा, यांसाठी सतत धडपड म्हणजे जीवन. ते न मिळाल्यास आपण मरून जाऊ. जीवन ही काही साचेबंद, सुरळीत चालणारी धोपट गती नव्हे; ती एक संमिश्र, गुंतागुंतीची अवस्था आहे. हा जो अंतर्जगत् व बहिर्जगत् यांमध्ये सारखा संघर्ष चालू असतो, त्यालाच आपण जीवन म्हणत असतो; आणि म्हणूनच ह्या संघर्षाचा अंत होताच जीवनाचाही अंत होणार, हे स्पष्ट आहे.

''या विश्वब्रह्मांडाचा नियंता असा एक ईश्वर अस्तित्वात आहे. सारं विश्व घसरंडीला लागलं असून तुमच्या–आमच्या मदतीची ते सारखी वाट पाहत आहे, अशी खरोखरीच वस्तुस्थिती नाही. ईश्वर त्यात सर्वदा विद्यमान आहे. तो अविनाशी, संतत क्रियाशील व सदा जागरूक आहे. ध्यानी घ्या की, जगावर उपकार करण्यानं वस्तुत: आपण स्वत:वरच उपकार करीत असतो. इतरांकरता आपण जे कार्य करतो, त्याचं मुख्य फळ आहे – 'आत्मशुद्धी'! सर्वदा दुसऱ्यांचं कल्याण करण्याच्या प्रयत्नात आपण स्वत:ला विसरून जाण्याचा यत्न करीत असतो. आत्मविस्मृती ही जीवनात शिकण्यासारखी एक मुख्य गोष्ट आहे. परोपकाराचं प्रत्येक कार्य, दुसऱ्याविषयी सहानुभूतीचं प्रत्येक चिंतन, इतरांना केलेलं सर्व साहाय्य वगैरे सारी सत्कार्ये आपल्या क्षुद्र 'मी'ला घटवीत असतात. ह्यांनी आपला 'स्वत:'चा विचार, 'स्व'ची भावना खूप कमी होते, आणि म्हणूनच ही कार्ये सत्कार्ये होत. या मुद्यावर ज्ञानी, भक्त व कर्मी या सर्वांचंच एकमत आहे. सर्वोच्च आदर्श म्हणजे कायमचे नि संपूर्ण आत्मविसर्जन. त्यात 'मी' मुळीच नाही; सर्व 'तू'च! कळत अथवा न कळत, कर्मयोग आपल्याला ह्याच स्थानी घेऊन जातो.

''जो धर्म चांगला असतो, तो सर्वोच्च आत्मत्यागावर, संपूर्ण आत्मविसर्जनावर उभा राहिलेला असतो. समस्त नीतीचा हाच पाया होय. हा आत्मत्यागच समस्त नीतिप्रणालीतील एकमेव मूलतत्त्व होय. हाच त्यातील मुख्य, मध्यवर्ती भाव होय. मनुष्य, पशू, देवता – सर्वांच्या संबंधात आपण ह्याच भावाचा एकमेव 'मानदंड' म्हणून सारखा उपयोग करू-शकू. जे लोक धर्माचे सर्वथैव विरोधी असतात, ते देखील, संपूर्ण आत्मविसर्जनाचं कार्य कुणी करीत असल्याचे दिसून आल्यास त्याच्याविषयी श्रद्धासंपन्न झाल्याखेरीज राहूच शकत नाहीत. नि:स्वार्थता म्हणजे ईश्वर होय!''

स्वामीजी म्हणतात, ''मूळ प्रश्नाकडं पुन्हा येऊ या. आपण पाहिलं की, चांगलं करू जाता काहीतरी वाईट, आणि वाईट करू जाता काहीतरी चांगलं केल्याखेरीज आपण काहीही करू शकत नाही. मग आपण कर्म करायचं कसं? या प्रश्नाची खरी खरी मीमांसा गीतेत आढळते, आणि ती म्हणजे अनासक्ती; निर्लिप्तता – जीवनातील कार्ये

पार पाडीत असता कशातच आसक्त व लिप्त न होणं. लक्षात ठेवा की, तुम्ही जगापासून संपूर्ण पृथक् आहा. तुम्ही जगात आहात खरे, परंतु तुम्ही काहीही केलं तरी ते तुमच्या स्वतःकरता नव्हे, हे विसरू नका. स्वतःकरता जे कार्य कराल, त्याचं फळ तुमच्यावर प्रभाव गाजवील. सत्कार्य कराल तर, त्याचं शुभ फळ तुम्हांला उपभोगावं लागेल; असत्कार्य कराल तर अशुभ फळ भोगावं लागेल. परंतु कार्य कोणतंही का असेना, ते जर तुम्ही स्वतःसाठी आचरणार नाही, तर त्याचा कसल्याच तऱ्हेचा प्रभाव तुमच्यावर पडू शकणार नाही. "मी हे स्वतःकरता मुळीच करीत नाही, असा बोध ज्याला झाला असेल, त्यानं जर साऱ्या जगाची हत्या केली किंवा तो स्वतः हत झाला, तरी तो हत्या करीत नाही व स्वतः हतही होत नाही;" असं अत्यंत अर्थगर्भ विधान आपल्या शास्त्रात आहे. तेव्हा कर्मयोग आपल्याला विशेषकरून शिकवतो की, जगाचा त्याग करू नका, जगात वास करा, जगाचा प्रभाव हवा तितका तुमच्यावर पडू द्या – परंतु तो भोगासाठी नको; कदापि नको! भोग तुमचं लक्ष्य न होवो. आधी 'स्वतः'ला मारून टाका आणि मग तुम्ही 'स्वतः' च हे सारं जगत् आहात, असा बोध बाळगा. जग जितकं आपल्यासाठी आहे, तितकंच आपणही जगासाठी आहोत!"

परिशिष्ट – २
भगवान श्रीकृष्णाच्या गीतेतील आदेश
The Lord's Commandments in the Gita

	चरणारंभ	अध्याय आणि श्लोकक्रमांक
१.	क्लैब्यं मा स्म गमः	२.३
२.	मात्रास्पर्शास्तु कौंतेय	२.१४
३.	अन्तवन्त इमे देहाः	२.१८
४.	हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं	२.३७
५.	सुखदुःखे समे कृत्वा	२.३८
६.	कर्मण्येवाधिकारस्ते	२.४७
७.	योगस्थः कुरु कर्माणि	२.४८
८.	बुद्धियुक्तो जहातीह	२.५०
९.	तस्मादसक्तः सततं कार्यं	३.१९
१०.	मयि सर्वाणि कर्माणि	३.३०
११.	तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ	३.४१
१२.	एवं बुद्धेः परं बुद्ध्वा	३.४३
१३.	तस्मादज्ञानसंभूतं	४.४२
१४.	यतो यतो निश्चरति	६.२६
१५.	तपस्विभ्योऽधिको योगी	६.४६
१६.	तस्मात्सर्वेषु कालेषु	८.७
१७.	नैते सृती पार्थ जानन्	८.२७
१८.	पत्रं पुष्पं फलं तोयं	९.२६
१९.	किं पुनर्ब्राह्मणाः	९.३३
२०.	मन्मना भव मद्भक्तो	९.३४
२१.	न तु मां शक्यसे द्रष्टुं	११.८
२२.	तस्मात्वमुत्तिष्ठ यशो लभस्व	११.३३
२३.	द्रोणं च भीष्मं च	११.३४
२४.	मय्येव मन आधत्स्व	१२.८
२५.	तस्माच्छात्रं प्रमाणं ते	१६.२४
२६.	चेतसा सर्वकर्माणि	१८.५७
२७.	तमेव शरणं गच्छ	१८.६२

२८.	मन्मना भव मद्‌भक्तो	१८.६५
२९.	सर्व धर्मान्परित्यज्य	१८.६६

गीता– सं. स्वामी शिवानंद
पृ. ८१३–८१९

परिशिष्ट – ३

'प्रतिज्ञा गीता'

	चरणारंभ	अध्याय व श्लोकक्रमांक
१.	नेहाभिक्रमनाशोऽस्ति	२.४०
२.	पार्थ नैवेह नामुत्र	६.४०
३.	क्षिप्रं भवति धर्मात्मा	९.३१
४.	अन्यन्याश्चिन्तयन्तो	९.२२
५.	अपि चेदसि पापेभ्यः	४.३६
६.	मन्मना भव मद्‌भक्तो	१८.६५
७.	तेषामहं समुद्धर्ता	७.७
८.	सर्वधर्मान्परित्यज्य	१८.६६

गीता– सं. स्वामी शिवानंद
पृ. ८२३–८२५

परिशिष्ट – ४

सप्तश्लोकी गीता

	चरणारंभ	अध्याय आणि श्लोकक्रमांक
१.	ओमित्येकाक्षरं ब्रह्म	८.१३
२.	स्थाने हृषीकेश	११.३६
३.	सर्वतः पाणिपादं	१३.१३
४.	कविं पुराणं	८.९
५.	ऊर्ध्वमूलमधःशाखं	१५.१
६.	सर्वस्य चाहं	१५.२५
७.	मन्मना भव मद्‌भक्तः	९.३४

गीता–सं. स्वामी शिवानंद
पृ. ८२२–८२३.

परिशिष्ट – ५

'तस्मात् – गीता'

	चरणारंभ	अध्याय आणि श्लोकक्रमांक
	अर्जुनाची शंका–	
१.	'तस्मान्नार्हा वयं हन्तुं...	१.३७

		श्रीकृष्णकृत शंकानिरसन
२.	अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयं	२.२५
३.	जातस्य हि ध्रुवो मृत्युः	२.२७
४.	देही नित्यमवध्योऽयं	२.३०
	श्रीकृष्णाचे बोधामृत	
५.	अन्तवन्त इमे देहा	२.१८
६.	हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं	२.३७
७.	तस्मात्सर्वेषु कालेषु	८.७
८.	तस्मात्त्वमुत्तिष्ठ	११.३३
९.	तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते	१६.२४
१०.	तस्मादोमित्युदाहृत्य	१७.२४
११.	तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ	३.४१
१२.	तस्माद्यस्य महाबाहो	२.६८
१३.	तस्मादज्ञानसंभूतं	४.४२
१४.	बुद्धियुक्तो जहातीह	२.५०
१५.	तपस्विभ्योऽधिको योगी	६.४६
१६.	नैते सृती पार्थ जानन्	८.२७
१७.	इहैवः तैर्जितः स्वर्गो	५.१९
१८.	कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि	३.१५
१९.	तस्मादसक्तः सततं कार्यं	३.१९
२०.	चातुर्वर्ण्यं मया सृष्टं	४.१३
२१.	एवं ज्ञात्वा कृतं कर्म	४.१५

–'सार्थ श्रीमद्भगवद्गीता'
सं.ग.का. रायकर, मुंबई–२
(१९६९) पृ. २२९–२२३

गुरुवर्य कृष्णाजी विष्णू तथा आबासाहेब कुलकर्णी

परिशिष्ट – ६

गुरुवर्य कृष्णाजी विष्णू तथा आबासाहेब कुलकर्णी

लेः व. दि. कुलकर्णी

बार्शी येथील 'न्यू इंग्लिश स्कूल' (नंतरचे 'सुलाखे हायस्कूल') या छोट्या शाळेचे आबा सुपरिन्टेन्डेन्ट होते. १९३३ च्या आगेमागे ते बार्शीस आले, त्यावेळी शाळा इंग्रजी तिसरीपर्यंतच होती. गावात म्युनिसिपालटीची इंग्रजी शाळा मॅट्रिकपर्यंतची होती व तिथं श्री जव्हेरी हे हेडमास्तर होते. जव्हेरी 'बी. ए. बी. टी. टी. डी. (लंडन)' होते; आबा हे पदवीपर्यंतच शिकलेले होते. पण गावात आबांचा दबदबा आणि मानसन्मान जव्हेरींच्या इतकाच होता. दोघे एकमेकांना मानून होते.

आबा खादी वापरीत. पांढरं शुभ्र धोतर, शर्ट आणि कोट. सर्व परीटघडीचं. खादीची घडीची काळी टोपी. सोनेरी फ्रेमचा चष्मा. सारे निर्मळ आणि शुभ्र. आबांच्या तांबूस गौर वर्णास यानं अधिकच तेजस्विता येत असे. त्यांचं चालणं शांत आणि संथ असे. ते येताना दिसताच मुलं चिडीचूप होत असत. आबांचा मोठा दरारा होता. मुलांवर माया करावी ती आबांनीच आणि शासनही करावं, ते त्यांनीच! आबा कान छान पिळीत; प्रसंगी हातावर छडीही देत. पण छडी देणारा हा हात, छडी घेणाऱ्या हातात मावणार नाही इतका तिळाचा हलवा, इतक्या रेवड्या संक्रांतीला देत असे. संक्रांतीला आबांच्या घरी तिळाच्या हलव्यांनी व रेवड्यांनी भरलेली ताटंच्या ताटं असत. आबांचा हात मोठा; मन त्याहून मोठं.

आबा म्हणजे अंतर्बाह्य स्वच्छ आणि निर्मळ व्यक्तिमत्त्व. शाळेच्या चौकात प्रवेश करताच विद्यार्थ्यांना दिसे, तो मोठा थोरला आरसा. त्यावर Cleanliness is next to Godliness असं लिहिलेलं असे. आबांनी स्वच्छतेचं देवत्वाशी जोडलेलं नातं अखंड सांभाळलं आणि आमच्या मनावर ते ठसवलं. विद्येचा मार्ग देवत्वाकडं जातो, हे त्यांच्या विचार–आचारातून अनुभवास येई. 'साधु युवाऽध्यापकः अशिष्ठः द्रढिष्ठः बलिष्ठः' हे आमच्या शाळेचं ब्रीदवाक्य होतं. मुलं विद्यासंपन्न आणि बलसंपन्न व्हावीत; त्यांचं मनोबल आणि नीतिधैर्य उच्च प्रतीचं असावं, याकडे त्यांचं लक्ष असे. शाळेत रामदास–नवमी साजरी होत असे. वाटली–डाळ आणि हवा तेवढा उसाचा रस–पेले भरभरून–त्यावेळी आम्ही घेत असू. हा खर्च आबांचा असे. आबा सहलीला आले

म्हणजे मोठमोठे डबे भरभरून चटण्या, भाज्या, पुऱ्या घेऊन येत असत. त्यांनी आणलेलं सायीचं दही अजून आमच्या जिभेवर आहे.

आबा स्वत:साठी फार थोडं जगत. ते मूळ कोल्हापूरचे. घरची खूप शेती. घर मोठं. चार बंधू. थोरल्या वहिनींची आईसारखी माया. दुसरे बंधू–दादा (सीतारामपंत) यांचं प्रेम फार. कोल्हापूरला घरी सराफी असे. घरात लाकडी कपाटात पैसे मोकळे पडलेले असत. लागेल त्यानं, लागतील तसे ते न्यावेत. हिशेब नसे. पण एकही भाऊ किंवा घरातील गडी–माणूस यानं कसलाही अपहार केल्याचं, कधीही कुणाला दिसून आलं नाही, असं आबा सांगत.

आबांचं शालेय शिक्षण कोल्हापूर इथंच झालं. कोल्हापुरात आर्य समाजानं चालविलेल्या कॉलेजमध्ये ते पुढं शिकू लागले. इन्टर आर्टस्‌ला असताना प्रा. ना.सी. फडके यांच्या भाषणानं राष्ट्रकार्याची प्रेरणा मिळाली आणि ते सांगली इथं भरलेल्या कॉंग्रेसच्या सभेस आपल्या दोन मित्रांसह गेले. तिथं शौकतअल्ली यांच्याशी हस्तांदोलन करून कोल्हापूरला अभिमानानं परतले. कॉलेजमध्ये ही वार्ता आधीच पसरली होती. त्या तिघांना कॉलेजमधून काढून टाकण्यात आलं. ते तिघेजण तडक पुण्यास निघून आले. निघताना आबांनी घरून २५ रुपये तेवढे घेतले.

पुण्यात हे तिघेजण रास्त्यांच्या वाड्यात राहिले. तिथं हौदावर ते मनसोक्त स्नान करत; गावात मनमोकळं हिंडत. टिळक विद्यापीठात शिक्षण घेत. तो काळ त्यांचा आनंदात गेला. ज.स. करंदीकर हे अर्थशास्त्र, चिंतामणराव वैद्य हे महाभारत आणि शिवरामपंत परांजपे हे अलंकारशास्त्र तिथं शिकवत असत. टिळक विद्यापीठातल्या उच्च प्रतीच्या अध्यापनानं त्यांना ज्ञानोपासना आणि राष्ट्रोपासना यामधील परस्परपोषक नातं त्यांच्या मनात दृढ झालं. तिथं आबांनी खूप वाचन केलं. अवांतरही खूपच वाचलं; किंबहुना तेच जास्त वाचलं. आजारी पडल्यानं पहिल्या वर्षी परीक्षेस त्यांना बसता आलं नाही. दुसऱ्या वर्षी ते बसले, पण एका विषयात गुण कमी पडल्यानं ते अनुत्तीर्ण झाले. पुन्हा त्यांनी परीक्षा दिली नाही. शिक्षण सोडलं. ते कोल्हापूरला आले. पूर्वीच्या प्राचार्यांना भेटले. त्यांनी कॉलेजच्या पहिल्या टर्म्स देऊ, म्हणून सांगितलं, पण 'अध्यापन आणि त्या द्वारा राष्ट्रसेवा आणि धर्मजागृती करायची, असं मी ठरवलं आहे,' असं प्राचार्यांना सांगून, त्यांचा आशीर्वाद त्यांनी घेतला. आर्यसमाजी पंजाबी प्राचार्य श्री. सिंग हे आतून मोठे देशसेवकच होते.

आबांनी कोल्हापुरात शाळा शिकत असताना शरीर चांगलंच कमावलं होतं. दंड–बैठका ते काढत, मारुतीची नित्य उपासना करीत. दर शनिवारी सकाळी मारुतीचं दर्शन घेऊन ते शाळेस जात. त्यामुळं उशीर होई. पण उशिराचं कारण विचारताच ते

'खरं तेच' सांगत; मुलं हसत. 'खरं सांगण्यात, ओशाळं, लाजिरवाणं काय आहे?' हा आबांचा प्रति प्रश्न असे. त्याच काळात संध्याकाळी 'तपोवना'त जमून ते सावरकरांचे पोवाडे म्हणत. त्यांचे शिक्षकही विद्यार्थ्यांचं तिथं सामूहिक गायन घेत असत. मसूरकर महाराजांचाही प्रभाव आबांच्या आंतरिक ध[illegible]वृत्तीवर व राष्ट्रसेवावृत्तीवर पडला होता.

आबा कोल्हापुरहून निघाले ते गाणगापूरजवळ एका गावात वसती करून राहिले. गूळ शेत्री जाऊन त्यांनी 'गुरुचरित्रा'ची पारायणं केली. अपरिग्रहवृत्तीनं ते राहिले. एका वळकटीशिवाय जवळ काही ठेवलं नव्हतं. 'महाराज' समजूनच लोक त्यांच्याशी वागत. जेवण कोणीही प्रेमानं देत. भोजनाला बोलावत. 'आपल्या गावी मुक्कामास या', म्हणून आमंत्रण देत. 'घरी पुरुषमाणसं नाहीत, तेव्हा देवळात राहा; पण नित्य भोजनास या,' असं मोकळेपणानं सांगणारी एक स्त्री या काळात भेटल्याचं, आबा तितक्याच मोकळेपणानं सांगत.

आबांच्या ठायी सद्धर्मप्रसारक, देशसेवक आणि अध्यापक या तिन्हींचंही अखंड वास्तव्य होतं. त्यांची प्रकृती सुदृढ होती. गाणगापूरच्या वास्तव्यानंतर ते ओगलेवाडीला आले. तिथं शाळा काढली. ती नेकीनं चालवली. पण तेथील भ्रष्टाचार आणि अमंगळता पाहून त्यांना उबग आला. गरीब मजूर आणि शिक्षक यांच्या बायकांचं शील सदैव धोक्यात असल्याचं त्यांना जाणवलं. एका सहशिक्षिकेच्या नातेवाईकांकडून तिच्याबाबत लग्नासंबंधी आबांना विचारणाही झाली. आबा ओगलेवाडी सोडून निघाले; किर्लोस्करवाडीस आले. तिथं शाळेत शिकवीत असताना त्यांनी 'किर्लोस्कर—खबर' मध्ये लेखनही केलं. 'किर्लोस्करांनी एका स्तंभासाठी आठ आणे मानधन दिलं' असं आबा मौजेनं सांगत. पुढं किर्लोस्करवाडी सोडून आबा सोलापूरला आले. मागासलेल्या स्तरातील मुलांसाठी त्यांनी शाळा काढली. सर्वस्व ओतून ही शाळा ते चालवीत असत; पण 'शाळा सोडण्यासाठीच मुलं शाळेत येतात, आणि पालकही त्यासाठीच त्यांना शाळेत घालतात;' हे विदारक सत्य त्यांच्या ध्यानात आलं. तरीही शाळा त्यांनी चालू ठेवली. पण स्वतः पालकांना त्याची गरज नव्हती आणि समाजाला कदर नव्हती. अखेर आबांनी स्वतः होऊन शाळा बंद केली.

हा काळ १९२०—२५—३० मधला. आबा ऐन पंचविशीत होते. आबांच्या मनात संसारवृत्ती तशी जागीच झाली नव्हती. तो काळही यास अनुकूल—पोषक होता. देशभक्ती आणि देवभक्ती, राष्ट्रप्रेम आणि धर्मप्रेम यांनी आबांचं मन व्यापून टाकलं होतं. त्याग आणि सेवा ही मूल्यं त्याकाळी राष्ट्रपुरुषांच्या जीवनात, आचरणात, पाहण्यास मिळत. तरुण यानं आकर्षित होत. गांधीजींच्या सत्याग्रह—बहिष्कारादी कार्यक्रमात आबा कधीच उतरले नाहीत; पण स्वतः निष्ठेनं ते सदैव सत्याग्रही राहिले; सेवाव्रती राहिले. स्वतंत्रपणे स्वमार्गानं जात राहिले.

बार्शीला आबा आले ते असे सिद्धमनाचे आणि कृतनिश्चयी होऊन आले. मो. स.

नामजोशी, या आधुनिक विचाराच्या, प्रयोगशील व कल्पक शिक्षकानं सुरू केलेल्या व वाढवलेल्या, पण दुर्दैवानं बंद पडत आलेल्या एका लहानशा शाळेत ते आले. नामजोशी शाळा सोडून गेलेले होते. आबांनी शाळा ताब्यात घेतली. ते स्थिर झाले. शाळाही त्यांनी स्थिर केली. शाळा लोखंडगल्लीतून सोमवार पेठेत 'तीन कंदिला' जवळ आली होती. वर्षभरातच सोलापूर जिल्ह्याचे कलेक्टर नाईट शाळेत आले. आले ते घोड्यावरूनच; थेट शाळेच्या चौकात. पूर्वसूचना नाही. बरोबर कुणीही नाही. हाफ पँट आणि जाड मिलिटरी शर्ट. असा थाट. शाळा पाह्यली. जागा अजून शाळेच्या ताब्यात आली नव्हती. लगेच जागेबद्दल हुकूम त्यांनी काढला. शाळेला जागा मिळाली.

इन्स्पेक्टर कॅमेरॉन हे रीतसर शाळातपासणीसाठी नंतर आले होते. ठरल्याप्रमाणे सारं पाहून–तपासून झाल्यावर 'What can I do for you?' असं त्यांनी सुपरिन्टेन्डेन्ट म्हणून आबांना विचारलं. ह्या प्रश्नास 'फॉर्मॅलिटी' न मानता आबांनी गंभीरपणे उत्तर दिलं, ''शाळेला इयत्ता ४; नंतर ५, नंतर ६ आणि नंतर ७, असे दरवर्षी एक याप्रमाणं इयत्ता वाढवण्याची परवानगी मिळावी;'' आणि तशी इन्स्पेक्टर कॅमेरॉन यांच्याकडून परवानगी मिळालीही. आबा आले तेव्हा शाळा तिसरीपर्यंतच होती.

आबा पढिक पंडित नव्हते. ते खऱ्या अर्थानं विद्यासेवक होते. त्यांचं वाचन नित्य, निवडक होतं. विद्याव्रती होते. अवलोकन आणि चिंतन सूक्ष्म होतं. इंग्रजी वृत्तपत्रं, नियतकालिकं ते नियमितपणे वाचत. 'टाइम्स' आणि 'मॉडर्न रेव्ह्यू'' आवर्जून वाचत. आम्हांसही पाहायला शिकवत. शाळेचं ग्रंथालय त्यांनी खुलं ठेवलं होतं. (Open-Shelf-Library.) मुलांनी जावं, हवं ते पुस्तक घ्यावं आणि वाचावं. पुन्हा जागच्या जागी नीट ठेवावं. ग्रंथालयात समोरासमोर दोन फळे लावलेले होते. एका फळ्यावर पृथ्वीचे दोन गोलार्ध काढलेले होते. आणि दुसऱ्या फळ्यावर जागतिक घटनांची त्या दिवशीची नोंद केलेली असे. त्या त्या संबंधित स्थळांचा निर्देश पृथ्वीच्या गोलार्धात रंगीत खडूनं केलेला असे. गीताजयंतीला आबांनी आम्हांस विनोबाजींची 'गीताई'; तर दासनवमीला 'सार्थ मनाचे श्लोक' प्रसाद म्हणून दिले होते. हे सारं आबा स्वखर्चानं करीत.

शाळा चांगली चालली होती. स्नेहसम्मेलनं, चित्रकलाप्रदर्शनं, गीताजयंती, दासनवमी, गणेशोत्सव, क्रीडोत्सव, वादस्पर्धा, हस्तलेखन–स्पर्धा असे अनेकविध उपक्रम चालू होते: ज.वा. केळकरांचं क्रिकेट–प्रेम, स.वा. केळकरांचं साहित्यप्रेम, व्ही.एस्. करंदीकरांचं विज्ञानप्रेम, बी.एस्. कुलकर्णी याचं गणितप्रेम, आर्.के. देशपांडे यांचे चित्रकलाप्रेम, के.बी. देशपांडे यांचं सहकार–प्रेम... इत्यादींनी शाळेला उच्च सांस्कृतिक पदवी लाभली होती. शाळेनं सोलापूर जिल्ह्यातील 'दशरथ टुर्नामेंटस्' मध्ये क्रिकेटची ढाल मिळवली. (श्रेय गुरुवर्य बी. एस्. कुलकर्णी यांना–) त्याच वर्षी इंग्रजी चवथीच्या जिल्हा स्कॉलर्शिप परीक्षेमध्ये प्रथम क्रमांकानं मी उत्तीर्ण झालो व मला तीन

वर्षांसाठीची शिष्यवृत्ती मिळाली. आबांची शाळा सोलापूर जिल्ह्यात सुप्रतिष्ठित झाली. मुख्याध्यापक म्हणून आबांना बार्शीत आणि सोलापूर जिल्ह्यात मान प्राप्त झाला. लोक आपल्याकडं एकदम किती सन्मानानं आदरानं पाहू-वागू लागले, ते मोठ्या गमतीनं आबा सांगत असत.

आबांच्या शाळेत आता चवथी निघाली होती; पाचवी निघाली होती. अध्यापनशास्त्रातील पदवीधर व्यक्ती मुख्याध्यापक म्हणून नेमणं आवश्यक झालं. त्याप्रमाणं श्री. ज.गं. करंदीकर (बी.ए.बी.टी.) यांची नेमणूक झाली आणि आबा सुपरिन्टेन्डेन्ट म्हणून राहिले. त्यात त्यांना कमीपणा वाटला नाही. मत्सर-द्वेष त्यांच्या वृत्तीत कधीच नव्हता. शाळेत एक घटना घडली. शाळेच्या कार्यकारी मंडळावरील एका वजनदार व्यक्तीच्या सर्वात थोरल्या मुलाला आबांनी छडीचा प्रसाद दिला. तेव्हा त्या मान्यवर सदस्यानं हेडमास्तरांना पत्र पाठवून जाब विचारला. हेडमास्तरांनी ते पत्र आबांना दाखवलं. आबांनी त्या पत्रावरच लिहिलं, "तुमच्या मुलाला विद्या यावी, असं वाटत असेल तर, मी केलेली शिक्षा योग्य आहे, असे मानावे;" आणि पत्र तसंच परत पाठवून दिलं.

आबा निर्भय आणि निःस्पृह होते. आपल्या विद्येत आणि कर्तव्यपालनात दक्ष होते. एकदा आबा इंग्रजी शिकवत असताना इन्स्पेक्टर भोंडे वर्गात आले. त्यांच्याबरोबर शाळेच्या कमिटीवरील श्री. दत्तोपंत तथा नानासाहेब सुलाखे आणि पंढरपूरच्या आपटे हायस्कूलचे हेडमास्तर श्री. आपटे, हेही वर्गात आले होते. आबा शिकवत असताना मध्येच भोंडे एकदम ओरडले, "कुलकर्णी मास्तर, हे तुमचं चूक आहे." मुलांदेखत, सर्वांदेखत हे घडलं याचा आबांना राग आला. त्याहीपेक्षा त्यांनी इंग्रजीची चूक केलीच नव्हती. आबा मुलांना शांतपणे म्हणाले, "मुलांनो, मी जे सांगितलं तेच लिहून घ्या. त्यात कसलीही चूक नाही." आणि ते बाहेर पडले. सर्वजणच बाहेर पडले. पुढं वाद-चर्चा होऊन आबांचंच खरं ठरलं. पण आबांनी याचा कधीही उच्चार केला नाही. भांडवल केलं नाही, की कोणावरही डूख धरला नाही. झालं ते होऊन गेलं, असं मानून ते शांत राहिले. नानासाहेब सुलाखे यांना मात्र आबांचा फार अभिमान वाटला. नानासाहेब हे स्वतः असेच निःस्पृह, सत्यनिष्ठ, तत्त्वनिष्ठ व नेकीचे सुप्रतिष्ठित नागरिक होते.

आबांना तशी नोकरीची आवश्यकता नव्हती. पगारावर ते विसंबून-अवलंबून नव्हते. दादांची व वहिनींची अपरंपार माया होती. दादा हे 'प्रभात फिल्म कंपनी'च्या संस्थापक-सदस्यांपैकी एक होते. प्रमुख होते. कोल्हापूरच्या आपल्या जमिनी गहाण टाकून त्यांनी १५००० रुपये कंपनीत घातले होते. ही गोष्ट १९२९ मधली. व्ही. शांताराम, बाबूराव पेंढारकर, केशवराव धायबर, दामले, फत्तेलाल ही मंडळी कंपनीत होती. बार्शीस आल्यावर मध्यंतरी आबांनी प्रभात कंपनीत 'जनरल मॅनेजर' म्हणून

काम पाहिलं. या मंडळींचं आणि आबांचं पटेना. आबांच्या ठिकाणी वर्णद्वेष, जातिद्वेष नव्हता. मनाची कृपणता नव्हती. आबा पदवीधर नव्हते. पण विद्येची थोरवी ते जाणत. विद्वानांचा ते सन्मान करीत. ते अभिमानी होते; पण अहंकारी नव्हते. आबांना कटू अनुभव आले. एकदा असाच त्यांचा अपमान करण्यात आला. आबा किल्ल्या फेकून ताडकन निघून आले. पुन्हा परत बार्शीस शांत–निर्मळ जीवनात उतरले. 'प्रभात कंपनी'त ते केवळ तीनच महिने होते.

बार्शीस आबा गृहस्थाश्रमी झाले. गमतीनं ते सांगत, ''वहिनी आणि दादा यांनीच मुलगी पाहिली. मला मुलगी पसंत करायचं जमत नाही; नाकारायचं जमत नाही. तेव्हा वहिनींनी सांगितलं, ''लग्न करा! मी लग्न केलं.'' बार्शीस सर्व ठीक चाललं. शाळा नावारूपाला आली होती. आबा तसे कुटुंबवत्सल झाले होते. पहिला मुलगा झाला.* आता आबा बार्शीचे कायमचे स्थायिक झाले, असं वाटलं. पण १९३७–३८ मध्ये अशी एक घटना घडली की आबांनी तडकाफडकी बार्शी सोडली....

बार्शीला स्वातंत्र्यवीर सावरकर आले होते (१९३७ मध्ये). अंदमान भोगून आणि रत्नागिरीची स्थानबद्धता संपवून प्रथमच सावरकर महाराष्ट्रात संचार करीत होते. अमर्याद आनंदानं आणि प्रचंड उत्साहानं जनता त्यांचं गावोगावी, जागोजागी स्वागत करीत होती. सर्व मुलांची व शिक्षकांची इच्छा होती की सावरकरांना शाळेत आणावं. बार्शीतले हिंदुमहासभेचे अध्यक्ष श्री. बाबाराव काळे यांना भेटून आबांनी ही भेट घडवली. याचा राग हिंदुमहासभाविरोधी अशा त्याच त्या प्रतिष्ठित व वजनदार शाळासमितीच्या सदस्यास आला. पुढं शाळेतील एका सभेस हेडमास्तर करंदीकर आणि पर्यवेक्षक आबा यांनी श्री. काळे यांना निमंत्रित केलं. उपरिनिर्दिष्ट सदस्य अधिकच संतापले व त्यांनी स्पष्टीकरण मागितलं. ''यात काहीच गैर नसल्याचं'' सांगून आबांनी तिथल्या तिथं राजीनामा देऊन टाकला. सर्वांनी त्यांचं मत वळविण्याचा खूप प्रयत्न केला. पण आबा शांत, समाधानी होते. मी त्यावेळी इंग्रजी पाचवीत होतो. आबांना आम्ही समारंभपूर्वक निरोप दिला. त्यांचे आशीर्वाद घेतले. 'मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव' यावर ते बोलले. सत्यनिष्ठा आणि सद्धर्मनिष्ठा यांची महती आम्हांस पटवून दिली. स्वाभिमान आणि स्वातंत्र्य यांचं रक्षण करणं आणि अन्यायाचा प्रतिकार करणं, हा आपला धर्म आहे, हे त्यांनी थोडक्यात आमच्या मनावर ठसवलं. आबांचे वय तेव्हा अडतीस होतं.

आबा नंतर पुण्यास आले. पुढं त्यांनी कुठंही नोकरी केली नाही. ते 'स्व–स्थ' राहिले. पुण्यास प्रभात कंपनीच्या परिसरातील दादांच्या बंगल्यात ते २–३ वर्षं होते. दादांनीच ठाणे इथं प्रभात थिएटर बांधून, आबांना त्याची मालकी दिली; आबा ठाण्यास

---

* (श्री. हेमंत कृष्णाजी कुलकर्णी, विधि–अधिकारी; विधि–विभाग, सचिवालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.)

आले. टेंबी नाक्यावरील आचार्यांच्या प्रशस्त बंगल्यात राहिले. आबांच्या आयुष्याचा उत्तरार्ध वयाची चाळीस वर्षं, ठाण्यात गेली. अखेरपर्यंत ते ठाण्यातच होते.

ठाण्यास प्रारंभी ते सामाजिक, धार्मिक जीवनात रस घेत होते. टेंभी नाक्याजवळील जुन्या ग्रंथालयाचे बरीच वर्षं ते अध्यक्ष होते. गावातील धार्मिक कार्यक्रमात प्रसंगविशेषी ते भाग घेत. एकदा प्रसादरूपानं 'आर्यधर्म प्रसारक मंडळ' या आपल्या संस्थेच्या वतीनं त्यांनी ज्ञानेश्वर महाराजांची 'चांगदेव पासष्टी' छापून प्रसाद म्हणून सर्वांना वाटली होती. पायथॅगोरसची वचनं एकत्रित करून त्यांचा मराठी अनुवाद त्यांनी केला व तो प्रकाशित केला. गावातील धर्म आणि विद्या या क्षेत्रांतील उपक्रमांस त्यांनी सढळ हातानं सतत आर्थिक साह्य केलं. या हाताचं दान त्या हाताला कधी कळू दिलं नाही. आबाचं समवयस्कांचं एक मित्रमंडळ होतं. त्यात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे कार्याध्यक्ष संचालक श्री. जी.एम्. लाड असत. ते करमणूक म्हणून ब्रिज खेळत. पण त्यांचं मन धर्म, तत्त्वज्ञान यामध्ये अधिकाधिक रममाण होत गेलं. महाभारत, गीता, भागवत, दासबोध यांचं ते नित्य वाचन–पठन करत. रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद यांचे ग्रंथ, ऋषिमुनींचं श्रुतिवाङ्मय, हे त्यांच्या मनन–चिंतनाचे विषय झाले होते. आबा कोणत्याही धर्मसंप्रदायाचे किंवा पंथाचे नव्हते. कोणत्याही कर्मकांडात आणि उपासना–चाकोरीत ते सापडलेले नव्हते. धर्मजीवनातही ते मुक्त–स्वतंत्र होते. त्यांनी संसार सोडला नव्हता; गृहस्थाश्रम टाकला नव्हता. त्यांना तीन मुलगे आणि एक मुलगी झाली. मुले सुविद्य झाली. आबा वानप्रस्थाकडं वेगानं जाऊ लागले.

आबा प्रभात थिएटरचे मालक; पण ह्या मालकांनी थिएटरमध्ये कधी पाऊल टाकलं नाही. एक बोलपटही पाहिला नाही. आम्हांला मात्र भरपूर बोलपट दाखविले. ठाण्यास भेटीला गेलो की ते भरपूर गप्पागोष्टी करीत. काव्य–शास्त्र–विनोदात वेळ जाई; खाण्याची रेलचेल असे... कशास काही उणं नसे. काकींना उत्तरोत्तर हे झेपत नसे; पण आबांचं यातलं काही कमी होत नसे. आबा मधून मधून निंबाळ, साकोरी, वज्रेश्वरी इथं जात, राहत. पण तिथल्या बाजारी, अशांत वातावरणानं उबगून परतत. घरीच त्यांनी शांतिमंदिर उभारलं. ठाण्यात तळ्याच्या बाजूला डॉ. मूस रोडला त्यांचा एक भला मोठा प्लॉट होता. तिथं 'शिवदर्शन' नावाची भव्य वास्तू त्यांनी उभारली. सबंध घर. तिथं पहिल्या मजल्यावर राहयला गेलं. आबा एकटे 'आचार्य बंगल्या'तच राहिले. आबा मनानं वानप्रस्थाश्रमी झाले. तिथंच पूजा, अर्चा, पुरश्चरण, पोथीवाचन, नामजपाचरण, योगासनं ते करीत. घराबाहेर ते पडतनासे झाले. कुणाला पत्रलेखन नाही. काही नाही. घरून डबा येई. मधून मधून तोही बंद करीत. आबा आत्ममग्न, आत्मस्थ राहिले. आम्ही त्यांना तिथं भेटत असू. तिथं गेल्यावर पूर्वीसारखं भरपूर बोलत. चहा, कॉफी, फळं असत. आता सदैव प्रसन्न, समाधानी असत. घरी लग्नकार्यं झाली, मंगल समारंभ झाले की आबा तेवढ्यापुरते घरी येत. पुन्हा आपल्या आश्रमात परत जात.

सर्वात धाकटा मुलगा, जनार्दन ऊर्फ मोहन, हा मेडिकलला होता. त्याची इटर्नशिप पुरी होत आली होती. दुर्दैवानं तो कर्करोगानं आजारी झाला. अतिशय लाडक्या मुलाला झालेल्या दुर्धर रोगानं काकींचा धीर सुटू नये म्हणून, आबा आपल्या आश्रमातून उठून 'शिवदर्शन'वर राहयला आले. आबांचा धर्म आणि धर्माचरण हे स्वायत्त प्रकरण होतं. ते कर्मठ–कर्मकाण्डात्मक प्रकरण नव्हतं. मुलाचा अल्पवयातला, ऐन तारुण्यातला मृत्यू कसा सोसायचा हे त्यांनी काकींना नीट समजावलं. मोहनच्या स्मृत्यर्थ त्यांनी धर्मार्थ औषधोपचार केन्द्र सुरू व्हावं यासाठी 'जनी जनार्दन' नावाचा एक ट्रस्ट स्थापन केला व त्यासाठी जे द्यायचं ते दिलं.

आबा नंतर 'शिवदर्शन' वरच थांबले. मधला मुलगा मयूर अमेरिकेत स्थायिक झाला होता. काकी, थोरले चिरंजीव हेमंत आणि सूनबाई सौ. शैलाताई, व नातवंडें सुयश, स्वरूप यांच्याबरोबर 'शिवदर्शन' मध्ये होत्या. त्यांची सर्वात धाकटी मुलगी अरुणाही तिथंच असे. पुढं काकी गेल्या. आबा 'शिवदर्शन' मध्येच होते. पंचाहत्तरी उलटली होती. तसा वानप्रस्थाश्रम संपून संन्यासाश्रम सुरू झाला होता. ते साक्षित्वानं राहत होते. कमलपत्रवत सारं वर्तन. ते 'स्व–स्थ' होते. स्वतःच्या ठिकाणी स्थिर होते. 'आत्मनि स्थित' होते. ''काही न करता 'स्व–स्थ' राहणं हा अवघड योग मला साधला आहे,'' असं ते गमतीनं म्हणत असत.

आबांनी बुधवार, दि. १३ ऑक्टोबर, १९८२ रोजी, संध्याकाळी ७.१५ वाजता, ठाणे येथील डॉ. प्रकाश भडकमकर यांच्या हॉस्टिलमध्ये देह ठेवला. मधुमेहानं अतिदीर्घकाल त्यांच्या देहात ठाण मांडलं होतं. त्यांनी मधुमेहाला क्वचितच आक्रमक होऊ दिलं होतं. पण अखेर त्यास त्यांनी मना केलं नाही. आबा गेले तेव्हा मी आजारी होतो. अंत्यदर्शनाला मला जाता आलं नाही. 'दैनंदिनी'त माझं मन मी मोकळं–हलकं करू पाहत होतो... मी म्हणत होतो– ''आज सभोवार चारित्र्याच्या नावानं अंधार आहे. आबा हेच तेवढं निष्कलंक चारित्र्य अखंडपणे माझ्या डोळ्यांपुढं होतं. आबा स्वाभिमानाचा मानदंड होते. वात्सल्याचे मनुष्यरूप होते. निर्मळ विनोदबुद्धी आणि कृतिशील अध्यात्मवृत्ती यांचं महन्मंगल रूप ते होते. हे सर्व आता दृष्टीआड गेलं. कायमचं अंतर्धान पावलं. आता अंधार अधिकच दाटत आहे.''

माझं पहिलं पुस्तक ('लीळाचरित्र : एक अभ्यास') मी आबांना अर्पण केलं, तेव्हाची गोष्ट. पुस्तक त्यांच्या चरणी ठेवताना आबा म्हणाले, ''मातृदेवतेच्या चरणी हे पहिलं पुष्प ठेवायला हवं होतं!'' पाठीवरून फिरणाऱ्या त्यांच्या हातात आईची माया पाझरत होती. त्यांच्या निर्मळ हास्यात पित्याचं वात्सल्य भरून राहयलं होतं. निघताना आबांनी मला, 'हवे ते ग्रंथ, हवे तितके घेऊन जा' म्हणून म्हटलं. मी त्यांच्या संग्रहातले 'महाभारता'चे सर्व भाग आणि स्वामी विवेकानंदांचे सर्व खंड घेतले. या ग्रंथांच्या सान्निध्यात मला आबा भेटतात आणि स्वधर्माचा विसर पडू देत नाहीत. 'सर्वे सर्वत्र नन्दन्तु' हे त्यांचं आशीर्वचन माझ्या अंतर्यामी अखंड जागं असतं!